१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
• मुंबई, सोमवार २० एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक- ४६, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 46 Marathi - Daily - Mumbai, 20 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
navakal.in
मतं जास्त... तरी विधेयक FAIL?
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# अजित पवारांच्या अपघाताची चौकशी
## महाराष्ट्र सीआयडीकडे वर्ग ! प्रकरण गुंडाळणार?

**राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी महाराष्ट्रात गुन्हा दाखल करून घेत नव्हते. म्हणून शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कर्नाटकात बंगळुरूमध्ये जाऊन तिथे गुन्हा दाखल केला. त्यानंतर आता या प्रकरणाचा तपास कर्नाटक पोलिसांनी महाराष्ट्र सीआयडीकडे वर्ग केला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र सीआयडी हा तपास गुंडाळणार अशी चर्चा सुरू झाली आहे.**



■ बारामती

**अजित** पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणी आ. रोहित पवार यांनी आधी मुंबईच्या आझाद मैदान पोलीस ठाण्यात आणि नंतर बारामती पोलीस ठाण्यात हेलिकॉप्टरच्या व्हीएसआर कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांनी हा गुन्हा दाखल करून घेतला नाही. रोहित पवार यांनी २५ मार्च रोजी कर्नाटकातील बंगळुरू येथील हाय ग्राउंड्स पोलीस ठाण्यात झीरो एफआयआर दाखल केला होता. गुन्हा घडलेल्या पोलीस ठाण्याऐवजी इतर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला जातो, त्याला झीरो एफआयआर म्हणतात. या एफआयआरला तात्पुरता शून्य क्रमांक दिला जातो. नंतर हा गुन्हा संबंधित पोलीस ठाण्याकडे वर्ग केला जातो. रोहित पवार यांनी काँग्रेसची सत्ता असलेल्या कर्नाटकात हा झीरो एफआरआय दाखल करून त्यात अपघाताबाबत अनेक संशयास्पद मुद्दे नमूद केले होते. तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा गुन्हा महाराष्ट्र पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. पाच दिवसांपूर्वी हा एफआयआर बारामती पोलीस ठाण्याकडे देण्यात आला होता. मात्र, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आता राज्य शासनाने हा एफआयआर सीआयडीकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. कर्नाटक पोलिसांनी या प्रकरणी नोंदवलेले जबाब आणि गोळा केलेले पुरावे आता सीआयडीच्या ताब्यात देण्यात आले आहेत. कर्नाटक पोलिसांकडून नवी माहिती मिळाल्यास सीआयडीला ती उपयुक्त ठरणार आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या अपघाताला कारणीभूत ठरलेल्या व्हीएसआर कंपनीच्या विमानांबाबत आ. रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. रोहित पवार यांनी दावा केला की, व्हीएसआर कंपनीची बहुतांश विमाने तांत्रिकदृष्ट्या सदोष असून त्यांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. ही विमाने उड्डाणासाठी धोकादायक असल्याने कंपनीचे वैमानिक आणि विमान कर्मचारी यांनादेखील अपघाताची भीती वाटत आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी झालेल्या कंपनीच्या बैठकीत वैमानिक आणि इतर कर्मचाऱ्यांनी सदोष विमानात » पान ७ वर

# ओपन एआयचे सीटीओ श्रीनिवास नोकरी सोडून भारतात परतणार

■ वॉशिंग्टन

**आर्टिफिशियल इन्टेलिजन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा सध्या जगभरात डंका आहे. ओपन एआय ही या क्षेत्रातील दिग्गज कंपनी आहे. या कंपनीमध्ये मुख्य तंत्रज्ञान अधिकारी (सीटीओ) या उच्च पदावर भारतीय वंशाचे श्रीनिवास नारायणन आहेत. मात्र त्यांनी हे मोठे पद सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे. श्रीनिवास ओपन एआयसारख्या कंपनीतील गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून देणार आहेत. आपल्या वृध्द माता-पित्यासोबत वेळ व्यतित करावा या उद्देशाने श्रीनिवास हे उच्च पदावरील नोकरीमुळे मिळणारे सर्व भौतिक फायदे सोडून भारतात परतणार आहेत.**



**ओपन** एआयमध्ये बिझनेस टू बिझनेस (बीटूबी) ॲप्लिकेशन्स विभागात सीटीओ पदावर ते मागील तीन वर्षांपासून कार्यरत होते. त्यांनी गेल्या महिन्यात वरिष्ठांना आपला राजीनाम्याचा निर्णय कळवला.एक्स पोस्ट करत त्यांनी सहकाऱ्यांचेही आभार मानले. ओपन एआयमधील माझा तीन वर्षांचा प्रवास बहुमुल्य होता. ही ३ वर्षे मला १० वर्षांएवढा अनुभव देऊन गेली आहेत. तुम्हा सर्वांचे सहकार्य मला लाभले त्याबद्दल मी तुमचा सदैव ऋणी राहीन, अशा शब्दांत भावना व्यक्त करत त्यांनी भारतीय संस्कारांचे दर्शन घडवले.

श्रीनिवास ओपन एआयमध्ये सुरुवातीला ॲप्लाईड इंजिनिअरिंग टीमचे प्रमुख होते. त्यावेळचा अनुभव आणि त्यावेळच्या सहकाऱ्यांचेही श्रीनिवास यांनी आभार मानले. ॲप्लाईड इंजिनिअरिंग विभागात काम करताना आलेले अनुभव कायमस्वरुपी स्मरणात राहतील, असे श्रीनिवास म्हणाले. त्यांनी ओपन एआयचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सॅम अल्टमन तसेच कंपनीचे सह संस्थापक आणि अध्यक्ष ग्रेग ब्रोकमन आणि अन्य उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचेही मनापासून आभार मानले. आपल्या भविष्यातील वाटचालीबाबत सांगताना श्रीनिवास म्हणाले की, तूर्त माझ्या मनात माझ्या वृद्ध माता-पित्यासोबत काही काळ व्यतित करावा हेच विचार आहेत. त्यानंतर पुढे काय करायचे ते ठरवता येईल. श्रीनिवास यांनी आयआयटी मद्रासमधून कॉम्प्युटर सायन्स या विषयात बी टेक ही पदवी मिळवली. त्यानंतर ते तावंता टेक्नॉलॉजीज या कंपनीत तंत्रज्ञान संचालक म्हणून रुजू झाले. पुढे २००७ साली त्यांनी भागीदारीमध्ये विरालिझर ही कंपनी स्थापन केली. या कंपनीत ते मुख्य तंत्रज्ञान अधिकारी होते. २००८ मध्ये त्यांनी मेटा (पूर्वाश्रमीची फेसबुक) कंपनीत अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली. २०२३ मध्ये त्यांची ओपन एआय सुरुवातीला अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली. सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांना सीटीओपदी बढती दिली. अशा प्रकारे आपल्या करिअरमध्ये यशाची एक एक शिखरे पादाक्रांत करणारे त्यांनी वयाच्या अवघ्या चाळीशीत अमेरिकेतील नोकरी सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.

# भोंदू अशोक खरातला पाचव्या गुन्ह्यात ५ दिवसांची पोलीस कोठडी



■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत आणखी एकदा वाढ झाली आहे. महिला अत्याचाराच्या पाचव्या गुन्ह्यात विशेष तपास पथकाने (एसआयटी) ताबा घेतल्यानंतर त्याला आज न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपीला २३ एप्रिलपर्यंत म्हणजेच ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

ही सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पार पडली. खरातचे वकील सचिन भाटे यांनी पोलीस कोठडीला विरोध केला. यापूर्वी दाखल झालेल्या चारही गुन्ह्यांमध्ये गुन्ह्याची पद्धत सारखीच आहे, त्यामुळे पुन्हा कोठडीची गरज नसल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, सरकारी वकिलांनी हा युक्तिवाद खोडून काढताना सांगितले की, आरोपीची गुन्हे करण्याची पद्धत एकसारखी असली तरी पीडित महिला वेगवेगळ्या आहेत. काही महिलांना गुंगीचे पदार्थ पाजून आणि फसवणूक करून अत्याचार करण्यात आले आहेत. या द्रव्यांचा स्त्रोत आणि गुन्ह्यामागील कट उघड करण्यासाठी पोलीस कोठडी आवश्यक आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरला आणि खरातला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. सुनावणीदरम्यान अशोक खरात याच्या वकिलांनी त्याच्या प्रकृतीचा मुद्दा उपस्थित केला. खरातच्या खांद्याचे ऑपरेशन झाले असून सतत » पान ७ वर

# गोव्यातील क्लब अग्निकांडातील सर्व आरोपी जामिनावर मुक्त!

■ पणजी

**गोव्यातील** साकवाडी हडफडे येथील 'बर्च बाय रोमियो लेन क्लब' आग दुर्घटना प्रकरणातील दोन्ही व्यवस्थापकांना म्हापसा अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात आतापर्यंत अटक करण्यात आलेले सर्व ११ आरोपी आता जामिनावर मुक्त फिरत आहेत. या आगीच्या घटनेत २५ जणांचा मृत्यू तर ६ जण गंभीर जखमी झाले होते.

या क्लबचे कॉर्पोरेट सरव्यवस्थापक व्यवस्थापक राजीव मोडक आणि ऑपरेशनल व्यवस्थापक बिजय कुमार सिंग यांना जिल्हा सत्र न्यायालयाने हा सशर्त जामीन मोर्चा केला. या दोघांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा जामीन आणि तितक्याच रकमेचा हमीदार, न्यायालयाच्या परवानगीशिवाय




देशाबाहेर न जाणे,सात दिवसांत पारपत्र जमा करणे आणि साक्षीदारांवर दबाव न आणणे अशा अटी न्यायाधीश द्विजपल पाटकर यांनी जामीन मंजूर करताना लागू केल्या आहेत.

# लग्न लपवले! रिसॉर्टवर अत्याचार टीसीएस पीडितेची पोलिसात तक्रार

■ नाशिक

**नाशिकमधील** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीत घडलेल्या कथित लैंगिक छळ प्रकरणात एका पीडितेने पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. अटक आरोपी पैकी एका आरोपीने आपले लग्न झाले असल्याची बाब लपवून तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि नंतर तिच्यावर धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा गंभीर आरोप तिने केला आहे.

पीडितेच्या म्हणण्यानुसार, चार वर्षांपूर्वी महाविद्यालयात ओळख झाल्यानंतर दोघांमध्ये मैत्री निर्माण झाली होती. पदवी पूर्ण झाल्यानंतर आरोपीने टीसीएसमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. जुलै २०२२ मध्ये त्याने पहिल्यांदा बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने विवाहित असल्याची माहिती लपवून पीडितेसमोर लग्नाचा प्रस्तावही ठेवला होता. यानंतर पीडितेला नाशिक येथील टीसीएस युनिटमध्ये नोकरी मिळाली, जिथे आरोपीही कार्यरत होता. ऑगस्ट २०२४ मध्ये आरोपीने तिला एका रिसॉर्टवर नेऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. फेब्रुवारी २०२६ मध्ये आरोपी विवाहित असून, त्याला दोन मुले असल्याचे समजताच पीडितेला मोठा धक्का बसला. आरोपीच्या पत्नीनेच स्वतः संपर्क साधून ही माहिती दिल्याचेही तक्रारीत नमूद » पान ७ वर

# नेस्को कॉन्सर्टमध्ये आरोपी आयुषला विनातिकीट प्रवेश! सुरक्षारक्षकाला अटक

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को सेंटर येथे आयोजित लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्ये आरोपी आयुष साहित्यला विनातिकीट प्रवेश दिल्या प्रकरणी पोलिसांनी एका सुरक्षारक्षकाला अटक केली.

आयुषला काल पोलादपूर पोलिसांनी मुंबई-गोवा महामार्गावर सापळा रचून अटक केली होती. तपासादरम्यान आयुष साहित्य यानेच कॉन्सर्टमध्ये 'एक्स्टसी' या अमली पदार्थाचा पुरवठा केल्याचे निष्पन्न झाले आहे. कॉन्सर्टमध्ये प्रवेशसाठी आयुषने सुरक्षारक्षकाला सुमारे एक ते दीड हजार रुपयांची लाच दिल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सुरक्षारक्षकाचा शोध घेतला. सुरुवातीला त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर रात्री उशिरा त्याला अटक करण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांनी संशयित आरोपी विनीत गेरेलानी यांच्या घरावर छापा टाकला. या कारवाईत सुमारे ३०५ ग्रॅम वजनाच्या पाच एक्स्टसी गोळ्या जप्त केल्या. या गोळ्यांवर 'मर्सिडीज'चा लोगो छापलेला असल्याची माहिती आहे. एका गोळीची किंमत अंदाजे १,५०० रुपये असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, आरोपीच्या वकिलांनी सर्व आरोप फेटाळून लावत या गोळ्या मुद्दाम ठेवण्यात आल्याचा आरोप केला आहे.

# गोव्याची साध्वी साईल 'मिस इंडिया' महाराष्ट्राची राजनंदिनी पवार उपविजेती

■ भुवनेश्वर

**गोव्याच्या** साध्वी सतीश साईलने ६१व्या फेमिना मिस इंडिया सौंदर्य स्पर्धेत 'मिस इंडिया २०२६' चा किताब पटकावला आहे. साध्वीला गतवर्षीची विजेती निकिता पोरवालच्या हस्ते मुकुट प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राची राजनंदिनी पवार उपविजेती ठरली. तर केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारी अद्वैता दुसरी उपविजेती ठरली. साध्वी आता पुढील 'मिस वर्ल्ड' स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा ओडिशातील भुवनेश्वर येथील



कलिंग इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजी कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आली होती.

या वर्षीची मिस इंडिया स्पर्धेची थीम डॉटर्स ऑफ धिस सॉईल अशी होती. या सोहळ्याचे सूत्रसंचालन मनीष पॉल आणि सारा-जेन डायस यांनी केले, तर इशान खट्टर यासारख्या कलाकारांनी रंगतदार सादरीकरण करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले.

साध्वी साईलने या स्पर्धेत चंदेरी आणि काळ्या रंगाच्या मोनोक्रोम गाऊन परिधान केला होता. या गाऊनमध्ये मेटॅलिक बीडवर्क आणि जियोमेट्रिक डिझाईन होते. ते पारंपरिक फुलांच्या डिझाईनपेक्षा वेगळे आणि आकर्षक होते. तिने स्लीक बन हेअरस्टाईल निवडली होती. महाराष्ट्राच्या राजनंदिनी यांनी ब्लश-पिंक रंगाचा 'मॉडर्न प्रिन्सेस' लूक सादर केला. तर अद्वैताने सोनेरी रंगाचा चमकदार गाऊन परिधान केला होता.

# इराणने होर्मुजवरील निर्बंध आता आणखी कठोर केले

■ तेहरान

**होर्मुज** सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या दोन भारतीय जहाजांवर काल हल्ला करण्यात आल्यावर आज इराणने होर्मुज सामुद्रधुनीवरील निर्बंध आणखी कठोर केले. आज इराणने असे जाहीर केले की, इराणची जहाजे होर्मुज सामुद्रधुनीतून जाऊ शकली नाहीत, तर इतर कोणत्याही देशाच्या जहाजांनाही तिथून जाऊ दिले जाणार नाही.

दरम्यान पाकिस्तानात उद्या चर्चेची दुसरी फेरी होत असून, त्यासाठी अमेरिकेचे विशेष दूत स्टिव्ह विटकोफ आणि जेरेड कुशनर हे प्रतिनिधी म्हणून इस्लामाबादला पोहोचणार आहेत. इस्त्रायल-लेबनॉन दरम्यान १० दिवसांच्या युद्धविरामानंतर इराणने होर्मुजची सामुद्रधुनी खुली करत असल्याची घोषणा केली होती. परंतु अमेरिकेने इराणच्या जहाजांना सामुद्रधुनीतून ये-जा करण्यास बंदी घातल्याने इराणनेही आपली घोषणा मागे घेतली. त्यामुळे होर्मुजची नाकाबंदी कायम राहिली असून, इराणने होर्मुजमधून प्रवास करणाऱ्या जहाजांवर हल्ले करायला सुरुवात केली. » पान ७ वर

# सारवरयुक्त पेय ओआरएस म्हणून विकणाऱ्या कंपनीविरुद्ध लढणाऱ्या डॉक्टरचा राजीनामा




**साखरयुक्त एनर्जी पेय ओआरएसएल रिहायड्रेशन सोल्युशन म्हणून (ओआरएस) विकणाऱ्या कंपन्यांविरूद्ध एकाकी लढा देणाऱ्या डॉ. शिवरंजनी संतोष यांनी बाल रोगतज्ज्ञांच्या इंडियन अकॅडमी ऑफ पेडिॲट्रिक्स (आयएपी) या संस्थेचा राजीनामा दिला आहे. बालकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या औषध निर्मात्यांविरुद्धच्या लढ्यात संस्थेने डॉ. शिवरंजनी यांची साथ दिली नाही. त्यामुळे संतापून त्यांनी राजीनामा दिला.**

■ मुंबई

**ओआरएसएल** हे उत्पादन जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्युएचओ) निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करत नाही. तरीदेखील हे उत्पादन बेधडकपणे 'ओआरएस' म्हणून विकले जाते. याविरूद्ध डॉ. शिवरंजनी यांनी आवाज उठवला होता. त्यांनी आणि अन्य काही बाल रोगतज्ज्ञांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अन्न सुरक्षा आणि दर्जा प्राधिकरणाने (एफएसएसएआय) गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये डब्ल्युएचओच्या मानकांमध्ये न बसणाऱ्या पेयांच्या वेष्टनावर ओआरएस असे लेबल लावण्यावर बंदी घातली होती. या एनर्जी पेयांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने मुलांच्या आरोग्यावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो, असे एफएसएसएआयने ओआरएस लेबल लावण्यावर बंदी घालताना स्पष्ट केले » पान ७ वर

# महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थनार्थ उद्या महायुतीचा मोर्चा

■ मुंबई

**महिला** आरक्षण विधेयकाच्या समर्थनार्थ मंगळवारी २१ एप्रिल रोजी वरळीत महायुती भव्य जनआक्रोश मोर्चा काढणार आहे. या मोर्चाचे रुपांतर जाहीर सभेत होणार आहे. ही जाहीर सभा वरळीच्या डोममध्ये पार पडेल. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर उद्या सोमवारी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीतील महत्त्वाचे नेते पत्रकार परिषद घेणार आहेत.

संसदेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह महायुतीतील नेते आक्रमक झाले आहेत. ते काँग्रेससह विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल करत आहेत. त्यातूनच महायुतीने वरळीतील जांबोरी मैदान ते वरळी डोमदरम्यान मोर्चा काढण्याचे ठरवले आहे. या विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेस आणि विरोधकांचा खरा चेहरा समोर आणण्यासाठी हा मोर्चा आयोजित केला जात आहे. या मोर्चामुळे आता राज्यातील राजकारण चांगलेच तापणार आहे.

# अक्षय तृतीयेला चारधाम यात्रा सुरू गंगोत्री-यमुनोत्रीचे दरवाजे उघडले

■ डेहराडून

**अक्षय** तृतीयेच्या पवित्र दिवशी गंगोत्री आणि यमुनोत्री धामांचे दरवाजे उघडल्याने आज चारधाम यात्रेला अधिकृतपणे सुरुवात झाली. वैदिक मंत्रोच्चार, धार्मिक विधी आणि 'जय मां गंगा' च्या घोषात गंगोत्री धामाचे दरवाजे भाविकांसाठी उघडण्यात आले. परंपरेनुसार, केदारनाथ मंदिराचे दरवाजे २२ एप्रिल रोजी आणि बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे २३ एप्रिल रोजी उघडले जातील. दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक चारधामच्या दर्शनासाठी येतात.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी हे स्वतः या गंगोत्रीच्या सोहळ्यात उपस्थित होते. दरवाजे उघडताना हजारो भाविक मंदिर परिसरात उपस्थित होते. 'हर हर गंगे' आणि 'मां गंगा की जय'च्या जयघोषांनी संपूर्ण गंगोत्री धाम दुमदुमून गेले. ठरलेल्या मुहूर्तानुसार दुपारी १२.१५ वाजता मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले. यावेळी हेलिकॉप्टरमधून फुलांचा वर्षावही करण्यात आला. पहाटेच भैरव घाटी येथून माता गंगेची उत्सव डोली गंगोत्री धामाकडे रवाना झाली. त्यापूर्वी भैरव घाटीत पूजा-अर्चना करण्यात आली.

# तामिळनाडूत फटाके कारखान्यात स्फोट! १६ मृत

चेन्नई

**तामिळनाडूतील** विरुधुनगरमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात १६ जणांचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. स्फोटाच्या वेळी सुमारे ३० कर्मचारी उपस्थित होते. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले असून बचावकार्य सुरू आहे. या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी दुःख व्यक्त केले आहे.
विरुधुनगरच्या कट्टनारपट्टी येथील फटाके कारखान्यात झालेला हा स्फोट इतका जोरदार होता की कारखाना पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. मदत व बचाव पथके घटनास्थळी तातडीने पोहोचली. आतापर्यंत अनेक मृतदेह ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले आहेत. स्फोट त्या वेळी झाला जेव्हा कर्मचारी काम करत होते. अचानक झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण परिसरात गोंधळ उडाला. स्फोटानंतर आग झपाट्याने पसरली आणि अनेक लोक आतच अडकले. अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आग विझवण्याचे काम सुरू केले आणि बचाव मोहीम राबवली. काही दिवसांपूर्वीही याच जिल्ह्यातील एका कारखान्यात स्फोट झाला होता.

# हातखंब्यात ४ वाहनांची धडक एक ट्रक विहिरीत कोसळला

रत्नागिरी

**मुंबई-गोवा** महामार्गावरील हातखंबा येथे आज चार वाहनांची धडक झाली. एका ट्रकने समोरून येणाऱ्या तीन वाहनांना जोरदार धडक दिल्यानंतर त्याचे नियंत्रण सुटले आणि तो रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत कोसळला. अपघातानंतर ट्रकखाली अडकलेल्या चालकाला स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. या घटनेत चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर तातडीने रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सदर ट्रक सळईने भरलेला असल्याची माहिती आहे.



# थायलंडमधील फुकेत येथे मराठी गुंतवणुकीला चालना! डॉ. सुनील विनायक मांजरेकर

मुंबई

**थायलंडमधील** फुकेत येथे मराठी उद्योग आणि संस्कृतीचा विस्तार करण्यासाठी डॉ. सुनील विनायक मांजरेकर यांनी पुढाकार घेतला असून, "Phuket9' या रिअल इस्टेट प्रकल्पात मराठी सहभाग वाढवण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू झाले आहेत. यामुळे फुकेतमध्ये लवकरच मराठी टाऊनशिप उभारली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
डॉ. मांजरेकर यांच्या एसक्युसीसी प्रॉपर्टीज एलएलसी, दुबई या संस्थेने "Phuket9' कंपनीसोबत करार केला आहे. सध्या फुकेतमध्ये युरोपियन आणि रशियन नागरिकांचे वर्चस्व असताना, मराठी गुंतवणूकदारांसाठी ही नवी संधी मानली जात आहे.
विशेष म्हणजे, फुकेतमध्ये पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर याची प्रतिकृती उभारण्यात आली असून, येथे दररोज पूजा व भजन होते. त्यामुळे मराठी संस्कृतीचा ठसा उमटताना दिसत आहे.
फुकेत हे वर्षभर पर्यटनासाठी प्रसिद्ध असल्याने, येथे गुंतवणुकीवर साधारण १० टक्के परतावा अपेक्षित असल्याचे डॉ. मांजरेकर यांनी सांगितले. तसेच, मालमत्तेचे व्यवस्थापन "Phuket9' कंपनीकडून केले जाणार असल्यामुळे गुंतवणूकदारांना अतिरिक्त जबाबदारी उरणार नाही. समुद्रकिनाऱ्यालगत हॉटेल्स, कॉन्डोमिनियम्स आणि लक्झरी व्हिला यांसारखे विविध पर्याय उपलब्ध असून, मराठी उद्योजकांसाठी ही 'सुवर्णसंधी' असल्याचेही त्यांनी नमूद केले.
फुकेतमधील रिअल इस्टेट गुंतवणुकीविषयी अधिक माहितीसाठी इच्छुकांनी Ms. Shreya Manjjarekar, SOC Corporation Properties LLC (Tel: +971 50 472 9635 / +971 45136075, Mob: +971 505343653) यांच्याशी संपर्क साधावा किंवा sunil@sqccproperties.com या ई-मेलवर संपर्क करावा. तसेच www.sqccproperties.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# सांगलीच्या कडेगावातील शेतकरी शक्तिपीठविरोधात आक्रमक

सांगली

**नागपूर-गोवा** शक्तिपीठ महामार्गाला सांगली जिल्ह्यातील विशेषतः कडेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांकडून मोठा विरोध होत आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावित मार्गात कडेगाव तालुक्यातील नेवरीसह अनेक गावांमधील सुपीक जमिनी जाणार असल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. सांगली जिल्ह्यातील २५ गावातील शेतकऱ्यांची जमीन शक्तिपीठ महामार्गात जाणार आहे. कडेगाव, खानापूर आणि वाळवा तालुक्यांतून हा महामार्ग जात असल्याने येथील बागायती जमिनी बाधित होणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

# २१ एप्रिलपासून खानोली गावात पौराणिक नाट्य महोत्सव सुरू

सिंधुदुर्ग

**कोकणची** लोककला असलेल्या दशावताराचा वारसा जपणारा दशावतार नाट्य मंडळाचा पौराणिक नाट्य महोत्सव २१ एप्रिल ते २७ एप्रिल या कालावधीत वेंगुर्ले तालुक्यातील खानोली गावात होणार आहे. या गावातील श्री देव रवळनाथ रंगमंचावर हा नाट्य महोत्सव संपन्न होणार आहे.
या महोत्सवाचे पहिले नाट्य पुष्प सागरेश्वर दशावतार नाट्य मंडळ आवेरे, दुसरे नाट्य पुष्प दत्तमाऊली दशावतार नाट्य मंडळ सिंधुदुर्ग. त्यानंतर आजगांवकर पारंपारिक दशावतार नाट्य मंडळ, मोचेमाडकर पारंपारिक दशावतार नाट्य मंडळ मोचेमाड. चेंदवणकर गोरे पारंपारिक दशावतार नाट्य मंडळ, आरोलकर पारंपारिक दशावतार नाट्य मंडळ आरवली आणि समारोपीय नाटक खानोलकर पारंपारिक दशावतार नाट्य मंडळ खानोली हे सादर करणार आहेत. महोत्सवाच्या निमित्ताने एका भव्य लकी ड्रॉचे आयोजन केले आहे.




# चहापाण्याची सवय

**पुण्यातील एका सरकारी पेन्शन कार्यालयात रोज सकाळी १० वाजता एक म्हातारे गृहस्थ न चुकता यायचे. त्यांचं नाव 'दिनकरराव'. वय ७० वर्षे. अंगावर अत्यंत स्वच्छ पण इस्त्रीचा कडकपणा गेलेला जुना सदरा, आणि पायात अनेक ठिकाणी शिवलेली चप्पल. दिनकरराव एका जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षक म्हणून निवृत्त झाले होते.**

गेले चार महिने त्यांची पेन्शन अचानक एका तांत्रिक चुकीमुळे (Technical Issue) थांबली होती. दिनकररावांच्या पत्नीला- 'सावित्रीबाईंना' दम्याचा भयंकर आजार होता. त्यांना रोज ऑक्सिजनचा सपोर्ट लागायचा. घरातले साठवलेले सगळे पैसे संपले होते. आता सावित्रीबाईंच्या औषधांसाठी पेन्शन मिळणं अत्यंत गरजेचं होतं.

कार्यालयातला 'शिरीष' नावाचा क्लार्क दिनकररावांची फाईल मुद्दाम दाबून बसला होता.

साहेब, माझी पेन्शन कधी सुरू होईल? माझ्या बायकोला श्वास घ्यायला त्रास होतोय. औषधांचे पैसे नाहीत माझ्याकडे, दिनकरराव अत्यंत काकुळतीने विचारायचे.

पण शिरीष नेहमी मोबाईलमध्ये डोकं खुपसून उत्तर द्यायचा, आज साहेब नाहीत, उद्या या... सर्व्हर डाऊन आहे, परवा या.

अखेर एका दिवशी दिनकररावांचा संयम सुटला. अहो शिरीषराव, गेले चार महिने मी या चपला झिजवतोय. माझं सगळं काम बरोबर आहे, मग तुम्ही माझी फाईल पुढे का पाठवत नाही?

तेव्हा शिरीषने आजूबाजूला पाहिलं आणि अत्यंत निर्लज्जपणे म्हणाला, मास्तर, तुम्ही ४० वर्षे पोरांना फक्त तत्त्वं शिकवली. पण हे सरकारी ऑफिस आहे. इथे नुसत्या कागदांवर फाईल सरकत नाही. टेबलाखालून 'चहापाण्याला' ५०० रुपये दिल्याशिवाय तुमची पेन्शन सुरू होणार नाही. असतील तर द्या, नाहीतर रस्ता मोकळा करा!

शिरीषने दिनकररावांची फाईल रागात बाजूला भिरकावून दिली.

दिनकररावांच्या स्वाभिमानाला भयंकर ठेच पोहोचली. ज्या बापाने आयुष्यभर लाचखोरी आणि भ्रष्टाचाराविरुद्ध विद्यार्थ्यांना धडे दिले, त्याला आज स्वतःच्याच हक्काच्या पैशांसाठी लाच मागत होते. दिनकरराव एकही शब्द न बोलता फाईल उचलून शांतपणे घरी निघून गेले. त्यांनी ठरवलं होतं, काहीही झालं तरी लाच देणार नाही.

पण नियतीला त्यांचे हे तत्त्व मान्य नव्हते.

त्याच रात्री सावित्रीबाईंचा आजार बळावला. ऑक्सिजन संपत आला होता आणि नवीन सिलेंडर



आणण्यासाठी खिशात एक रुपयाही नव्हता. सावित्रीबाई श्वास घेण्यासाठी तडफडत होत्या. दिनकररावांनी स्वतःचा तो जुना सदरा डोळ्यांना लावला आणि ते रात्रभर त्या अंधाऱ्या घरात रडत बसले. त्यांच्या स्वाभिमानाचा आता पूर्णपणे चुराडा झाला होता.

दुसरा दिवस उजाडला. सकाळी ११ वाजता पेन्शन कार्यालयात नेहमीप्रमाणे गर्दी होती.

शिरीष आपल्या खुर्चीवर बसून चहा पीत होता. तेवढ्यात समोर दिनकरराव येऊन उभे राहिले. आज त्यांच्या चेहऱ्यावर पूर्वीसारखी ती शिक्षकाची कडक झळाळी नव्हती. त्यांचा चेहरा निस्तेज पडला होता आणि डोळे लालबुंद झाले होते.

दिनकररावांनी आपला थरथरणारा हात खिशात घातला. त्यांनी एक अत्यंत चुरगळलेली, जुनी ५०० रुपयांची नोट काढली. त्यांनी शेजारच्या दुकानदाराकडून ती नोट उसनी मागून आणली होती!

त्यांनी ती ५०० ची नोट शिरीषच्या टेबलावर ठेवली आणि त्या नोटेच्या अगदी खाली एक पांढरा कागद ठेवला.

शिरीष हसला. हाहा! मास्तर, शेवटी आलात ना वठणीवर! कालच दिले असते ५०० रुपये, तर आजपर्यंत



पेन्शन खात्यात जमा झाली असती. द्या ती फाईल इकडे... असं म्हणत शिरीषने अत्यंत मग्रुरीने ती ५०० ची नोट उचलली.

पण ती नोट उचलताच... त्या नोटेखाली ठेवलेला तो पांढरा कागद शिरीषने वाचला... आणि पुढच्याच सेकंदाला त्याच्या हातातील चहाचा कप थेट फरशीवर सटकला!

त्याच्या पायाखालची जमीन दुभंगली आणि शरीरातलं रक्त तिथेच गोठलं!

तो पांढरा कागद पेन्शनची फाईल नव्हती... तो सावित्रीबाईंचा 'डेथ सर्टिफिकेट' (Death Certificate - मृत्यूचा दाखला) होता!

पैशांअभावी वेळेवर ऑक्सिजन न मिळाल्याने काल रात्रीच सावित्रीबाईंनी तडफडून प्राण सोडले होते.

दिनकररावांनी शिरीषवर कोणताही आरडाओरडा केला नाही. त्यांनी त्याची कॉलर पकडली नाही की त्याला शिव्याही दिल्या नाहीत. ते अत्यंत कोरड्या, निर्जीव आणि भयानक शांत आवाजात म्हणाले...

शिरीषराव, आयुष्यभर मी कधी कुणापुढे हात पसरला नाही. पण काल रात्री माझ्या बायकोच्या तडफडणाऱ्या श्वासांनी माझा स्वाभिमान मारून टाकला. मी तिच्या औषधांसाठी हे ५०० रुपये भीक मागून आणले होते... पण मी घरी पोहोचेपर्यंत माझा देवच मला सोडून गेला! आता या पैशांची मला गरज नाहीये... हे ५०० रुपये ठेवा आणि तुमचा तो 'चहा' शांतपणे पिऊन घ्या. फक्त आता माझ्या पेन्शनच्या फाईलची काहीच घाई करू नका... कारण जिच्यासाठी मी चार महिने या रांगेत उभा होतो, तीच आता या जगात उरली नाहीये.

दिनकररावांचे ते मूक आणि शांत शब्द त्या सरकारी कार्यालयात एखाद्या बॉम्बसारखे पडले. तिथे उपस्थित असलेल्या संपूर्ण कार्यालयात स्मशानशांतता पसरली.

दिनकरराव अत्यंत शांतपणे वळले आणि आपल्या त्या शिवलेल्या चपला ओढत, रिकाम्या हाताने त्या कार्यालयातून कायमचे निघून गेले.

शिरीष स्वतःच्या खुर्चीवर एखाद्या दगडासारखा थिजून बसला होता. त्याच्या हातातली ती ५०० रुपयांची नोट आज त्याला जगातल्या कोणत्याही आगीपेक्षा जास्त चटके देत होती. त्याने एकही शब्द उच्चारला नाही, पण त्या एका क्षणात, दिनकररावांच्या त्या भयानक शांततेने आणि मूकपणाने त्याच्या भ्रष्ट आयुष्याला आणि त्याच्या अस्तित्वाला कायमची काळीमा फासली होती.

सरकारी कार्यालयातील ही 'चहापाण्याची' (लाच) सवय गरिबांचा किती अंत पाहते? गरिबांचे मुके अश्रू या व्यवस्थेला कधी बदलू शकतील का? तुमचं मत नक्की कमेंट करून सांगा.

# ठाणे पालिकेतील नगरसेवकांना निवृत्ती वेतन देण्याची मागणी

**आज महासभेत चर्चा होणार**

ठाणे

**ठाणे** महापालिकेतील नगरसेवकांना आमदारांच्या धर्तीवर निवृत्ती वेतन सुरू करण्याची मागणी माजी महापौर आणि विद्यमान नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांनी केली आहे. त्यांनी यासंदर्भातील प्रस्तावाची सूचना महापौर शर्मिला पिंपळोळकर यांच्याकडे सादर केली आहे. यावर उद्या सोमवारी होणाऱ्या महासभेत चर्चा होणार आहे. नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या प्रस्तावात नमूद केले आहे की, नगरसेवक पदावर असताना निश्चित वेतन नसते आणि सेवानिवृत्तीनंतरही कोणतीही आर्थिक सुरक्षा नसते. त्यामुळे नगरसेवकांना पेन्शन लागू करणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे आमदार आणि खासदारांना पेन्शन मिळते, त्याचप्रमाणे जनसेवेचे काम करणाऱ्या नगरसेवकांनाही सेवानिवृत्तीनंतर पेन्शन मिळावे.
ज्या नगरसेवकांनी किमान २ वर्षे नगरसेवक पद पूर्ण केले आहे, त्यांना ही योजना लागू करावी. तसेच नगरसेवक प्रभागातील विकासकामे आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने काम करतात, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. यापूर्वी सप्टेंबर २०१७ मध्येही मीनाक्षी शिंदे यांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना नगरसेवकांसाठी पेन्शन योजना लागू करावी, असे पत्र दिले होते. या मागणीमुळे ठाणे महापालिकेच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडू शकतो. अन्य नगरसेवकांचेही म्हणणे आहे की, जर लोकप्रतिनिधींना पेन्शन दिली जात असेल, तर नगरसेवकांसोबत भेदभाव करू नये. दुसरीकडे पालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, नगरसेवकांसाठी पेन्शन धोरण निश्चित करण्याचे अधिकार पालिकेऐवजी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे आहेत.

# समृद्धीवर बसचा अपघात! दीड वर्षीय मुलाचा मृत्यू

बुलडाणा

**मुंबईहून** पुसदकडे जाणाऱ्या खासगी प्रवासी बसचा आज पहाटे समृद्धी महमार्गावर अपघात झाला. बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर टोल नाक्याजवळ झालेल्या या अपघातात दीड वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला असून, २५ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.
आज सकाळी सहा वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. खासगी बसने एका कारला जोरदार धडक दिली. या धडकेत कारचेही मोठे नुकसान झाले. अपघातानंतर जखमींना तत्काळ मेहकर ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. सध्या जखमींवर उपचार सुरू असून गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेचा पुढील तपास संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे.

# धारावी प्रकल्पाला स्थगिती मागणारी याचिका फेटाळली

**हस्तक्षेप करण्यास हायकोर्टाचा नकार**

मुंबई

**जोपर्यंत** धारावी कोळीवाड्याच्या सीमा निश्चित होत नाहीत, तोपर्यंत धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला स्थगिती द्यावी, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. या प्रकल्पाला २०१६ मध्ये मंजुरी मिळाली असून, या प्रक्रियेला आता अंतिम स्वरुप प्राप्त झाले आहे, असे निरीक्षण नोंदवित न्यायालयाने याप्रकरणी हस्तक्षेप करण्यास नकार दिला.
'धारावी कोळी जमात ट्रस्ट' या सामाजिक संस्थेने धारावी कोळी बांधवांच्यावतीने ही याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती एस. एम. मोडक यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांना दिलासा देण्यास न्यायालयाने नकार दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत ३ मार्च २०२६ रोजी सरकारने काढलेली अधिसूचना अंतिम झाली आहे. त्यानुसार विकास सुरू झाला असून, अशावेळी अनेक वर्षांनंतर सीमांकनाची मागणी करून विकास रोखणे योग्य नाही. याचिकाकर्ते ज्या जमिनीवर पारंपरिक मासेमारीचा दावा करत आहेत त्या जमिनीने आपला मूळ विस्तार केव्हाच गमावला असून, तिथे अतिक्रमणे झाली आहेत. तसेच सदर याचिका गुणवत्तेशिवाय व चुकीच्या समजुतीवर करण्यात आलेली आहे. गेल्या १५ वर्षांपासून धारावीतील कोळीवाड्याच्या बाह्य सीमा निश्चित केलेल्या नाहीत. त्यामुळे पुनर्विकास प्रकल्पातून २ लाख चौमी भाग वगळण्यात यावा व विकासकामे थांबवावीत मुंबईतील इतर ७ कोळीवाड्यांप्रमाणेच गावठाण स्तरावर सर्वेक्षण पूर्ण करावे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण सामाजिक आव्हान

एकीकडे महिलांच्या आरक्षणावरून गदारोळ सुरू असताना सामान्य स्तरावर आणि त्याही कौटुंबिक स्तरावर महिलांचे संरक्षण हा तितकाच महत्त्वाचा मुद्दा ठरतो आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांची संख्या ६७ टक्के आहे. म्हणजे पुरुष संख्येपेक्षा महिलांची संख्या वाढते आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच हे सर्वात मोठे परिवर्तन घडून आलेले आहे. आणि इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या महिलांना कुटुंबांमध्ये आणि समाजामध्ये योग्य तो सन्मान आणि आदर मिळाला पाहिजे ही अतिशय माफक अपेक्षा ठरते. दुर्दैवाने आज महिलांवरच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होते आहे. शिवाय धक्कादायक भाग म्हणजे कुटुंबांमध्ये घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. शहरी भागात हे प्रमाण तीस ते पस्तीस टक्क्यापर्यंत जाऊन पोहचले आहे. तर ग्रामीण भागामध्ये वीस टक्क्यापर्यंत हे प्रमाण आहे. ज्या वेगाने घटस्फोटांची संख्या वाढते आहे ते पाहिल्यानंतर कुटुंबांमध्येसुद्धा महिलांच्या सुरक्षिततेविषयी प्रचंड उदासीनता असल्याचेच म्हणावे लागते. खरे तर ही केवळ उदासीनता नसून तो सर्वात मोठा सामाजिक कलंक म्हणता येतो. आजची महिला शिकली सवरलेली आहे. तिच्याकडे असलेल्या शिक्षणाचा शिवाय इतर गुणांचा योग्य तो आदर व्हावा ही माफक अपेक्षा असते. परंतु वर्षानुवर्षांची पुरुषसत्ताक मानसिकता अजूनही महिलांना ते स्थान द्यायला तयार नाही. विशेषतः शहरी भागातले घटस्फोटांचे हे प्रमाण अत्यंत चिंताजनक ठरते. देशपातळीवर रोज किमान तीनशे ते चारशे घटस्फोटांची प्रकरणं दाखल होत असतात. आणि सरसारी देशपातळीवर रोज शंभर घटस्फोटाच्या घटना घडतात. जागतिक स्तरावर होणाऱ्या घटस्फोटांच्या तुलनेत हे प्रमाण नगण्य जरी ठरत असले तरी भारतासारख्या संस्कृतीप्रधान शिवाय कुटुंब व्यवस्थेचा मजबूत आधार असलेल्या समाजव्यवस्थेसाठी तो एक मोठा इशारा ठरतो. हेच प्रमाण कायम राहिले तर पुढच्या पंचवीस वर्षांत घटस्फोट ही राष्ट्रीय समस्या म्हणूनच विचारात घ्यावी लागेल. सामाजिकदृष्ट्या किंवा समाजव्यवस्थेला धक्का देणारी ही बाब वेळीच विचारात घेतली पाहिजे.

### पुरुषसत्ताक मानसिकता

या सगळ्या बदलत्या परिस्थितीत महिलांचे कुटुंबातले आणि समाजातले स्थान टिकवण्यासाठी पुरुषसत्ताक मानसिकता बदलणे गरजेचे ठरते. महिलांकडूनही काहीवेळेला काही प्रकरणांमध्ये गैरसमज आणि हट्टी भूमिकेचा परिणामही घडून येतो. परंतु आजच्या सुशिक्षित आणि तंत्रज्ञानयुक्त जगामध्ये महिलांच्या आदराचा आणि सन्मानाचा विषय अग्रक्रमाने पुढे गरजेचे आहे. जर कुटुंब स्तरावरच तिला डावलले जात असेल किंवा कुटुंबातच तिला योग्य ते स्थान मिळत नसेल तर सामाजिक स्तरावर तिची होणारी अवहेलना वाढण्याचीच शक्यता आहे. आज राष्ट्रीय गुन्हे शाखेच्या अहवालाप्रमाणे संपूर्ण देशभरात महिला अत्याचारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अगदी महाराष्ट्रसुद्धा त्यात मागे नाही. संपूर्ण देशपातळीवर गेल्या तीन वर्षांत महिलांच्या हत्येच्या प्रमाणामध्येसुद्धा २६ टक्के वाढ नोंदली गेली आणि एकूण अत्याचाराच्या घटनांमध्येदेखील ३० टक्के वाढ झाल्याचे सांगितले गेले. एकीकडे अत्याचाराच्या घटनांत होत गेलेली वाढ तर दुसरीकडे कौटुंबिक पातळीवर महिलांचा होणारा छळ त्यांना दिली जाणारी दुय्यम दर्जाची वागणूक यातून काळ जरी बदलला असला तरी महिलांची सुरक्षितता अजूनही चिंताजनकच ठरलेली आहे. अत्याचाराच्या किंवा घटस्फोटांचे प्रमाण लक्षात घेतले तर महिलांचे समाजातील स्थान भक्कम करण्याच्या दिशेने अधिक ठोस पावलं पडण्याची आवश्यकता वाटू लागते. त्याची सुरूवात व्यक्तीगत किंवा कुटुंब पातळीवरून केली पाहिजे. विशेषतः चोवीस ते तीस या वयोगटात घटस्फोटांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून आलेले आहे. अगदी उच्चशिक्षित असूनही समंजसपणाचा अभाव आणि एकमेकांना समजून घेऊन समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता नसल्याने हे प्रकार वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. भारतासारख्या कुटुंबप्रधान व्यवस्थेला लागलेले हे मोठे गालबोट ठरते. एकमेकांमधील सुसंवाद नसल्याने आणि अतिशय क्षुल्लक कारणांवरून गैरसमज करून घेण्याचे प्रकार आणि उद्भवलेल्या परिस्थितीतून विचारपूर्वक मार्ग काढण्याची तयारी नसते. अहंकार किंवा इगो दुखावल्याने एकमेकांपासून हरकत घेण्याकडे अधिक कल दिसून येतो.

### महिलांवर सर्वाधिक परिणाम


यातला सर्वात वेदनादायक भाग म्हणजे घटस्फोटाच्या घटनेनंतर त्याचे सर्वाधिक परिणाम हे महिलांना भोगावे लागतात. कारण स्वतःचं करिअर सांभाळत असताना सामाजिक स्तरावर स्वतःचा योग्य तो सन्मान ठेवून घेण्यासाठीसुद्धा प्रचंड मेहनत घ्यावी लागते. विशेषतः शहरी जीवनामध्ये घटस्फोटित महिलांना अखंड सावधानता बाळगावी लागते. परिणामी तिच्या वैयक्तीक जीवनामध्ये करिअरबरोबरच स्वतःची सुरक्षितता हा मुद्दा अधिक महत्त्वपूर्ण ठरतो. खरे तर आज महिला पूर्वीपेक्षा अधिक सक्षम झालेली आहे. अनेक अर्थांनी तिला आत्मनिर्भरही म्हणता येईल. परंतु समाजव्यवस्थेचा विचार करीत असताना आणि आयुष्याचा प्रवास अधिक सुखकर होण्याच्यादृष्टीने तिची सुरक्षितता आणि सन्मान या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. घटस्फोटानंतरचे जीवन निश्चितच कसोटी पाहणारे असते. परंतु यासाठी सामाजिक आणि कुटुंब स्तरावरची पुरुषी मानसिकता बदलणे अधिक गरजेचे ठरते. घटस्फोटासाठी वेगवेगळी कारणं जरी समोर येत असली तरी दोघांच्याही दृष्टीने या प्रसंगाला सामोरे जाणे कठीणच ठरते. सरकारी पातळीवरून या सामाजिक समस्येचा खूप वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची वेळ आलेली आहे. समुपदेशनापासून तर पुन्हा एकत्र येणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्यापर्यंत अनेक योजना राबवता येऊ शकतात. आज तर अनेक उच्चशिक्षित कुटुंबांमध्ये पैसा किंवा सांपत्तिक स्थिती चांगली असते. परंतु मानसिक स्तरावरचे हे ताणतणाव आणि ओढाताण समाधान मिळू देत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. घटस्फोट ही कौटुंबिक स्तरावर जेवढी समस्या आहे तेवढेच सामाजिक स्तरावर तितकेच मोठे आव्हान ठरते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

ठरवलं आणि लगेच झालं असं कधीच होत नाही. थोडा संयम ठेवा, हाल होतील, पण हार होणार नाही. कारण संघर्ष रडवतो, पण आयुष्य घडवतो.

## पंचांग



**सोमवार, २० एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
* वैशाख शुक्ल तृतीया/चतुर्थी
* नक्षत्र - रोहिणी
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृषभ

रवी उदय- ०६-१९
रवी अस्त- १८-५६

**वृषभायन सकाळी ७.०८, ग्रीष्म ऋतू प्रारंभ, एकोरामाराध्य जयंती**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### ज्वारीचे पापड

★ **साहित्य :-** १ कप ज्वारीचे पीठ, २ कप पाणी, ४ कप पाणी मीठ चवीनुसार, १/४ टीस्पून बेकिंग सोडा, १ टीस्पून पापड खार, २ टीस्पून पांढरे तीळ, १ टीस्पून जिरे, १ टीस्पून मिरचीचा फ्ले.

★ **कृती :-** एक मोठी वाटी घेऊन त्यात १ पाणी घ्यावे. त्यात ज्वारीचे पीठ चांगले मिक्स करून पेस्ट बनवा. ते बाजूला ठेऊन द्या. एका पातेल्यात १ पाणी गरम करा. त्यात मीठ, खाण्याचा सोडा, पापड खार, तीळ घाला आणि चांगले मिसळा. आता पाण्याला उकळी आली की, त्यात ज्वारीची पेस्ट घाला आणि घालताना सतत मिसळा. घट्ट होईपर्यंत शिजवा आणि छान चकाकी येईपर्यंत शिजवा. शिजवताना सतत ढवळत राहा. नंतर १० मिनिटे ते शिजू द्यावे. नंतर ते घट्ट होईल व त्याला चकाकी येईल. गॅस बंद करा आणि जिरे, चिली फ्लेक्स घाला आणि चांगले मिक्स करा. तुम्ही चिली फ्लेक्सच्या जागी हिरवी मिरची पेस्ट किंवा लाल मिरचीची पेस्ट घालू शकता. किंवा तुम्ही ते पूर्णपणे वगळू शकता. प्लास्टिकची शीट घ्या.



स्टीलच्या प्लेट्सला तेल पसरवून त्यावर पापड पातळ एकसारखे पापड बनवू शकता. हे पापड तुम्ही उन्हात किंवा घरातही वाळवू शकता. सुमारे ६-७ तास सुकल्यानंतर, जेव्हा ते थोडे मऊ होतील तेव्हा त्यांना पलटून टाका. पापडाच्या कडा प्लास्टिक सोडू लागल्यावर उलटा करा. पापड पूर्णपणे सुकल्यावर कोरड्या हवाबंद डब्यात ठेवा.

## क्रीडा



# कोलकाताने कसेबसे विजयाचे खाते उघडले
## रिंकूच्या फटकेबाजीसमोर राजस्थानने नांगी टाकली



**रिंकू सिंग आणि अनुकूल रॉय यांनी ७ व्या विकेटसाठी ७६ धावांची निर्णायक भागिदारी केल्यामुळे आज कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सला ४ गडी राखून पराभूत करून ७ व्या सामन्यात आपला पहिला विजय नोंदवला. कोलकातामध्ये आज झालेल्या आयपीएलच्या २८ व्या सामन्यात राजस्थानने २० षटकांत ९ गडी गमावून १५५ धावा केल्या. प्रत्युत्तरात कोलकाताने १९.४ षटकांत ६ गडी गमावून १६१ धावा करून सामना जिंकला. या विजयासह कोलकाता आयपीएलच्या गुणतालिकेत ३ गुणांसह दहाव्या स्थानावरून नवव्या स्थानावर आला**

■ न्यू चंदीगड

**राजस्थानचा** कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल यांनी राजस्थानला चांगली सुरुवात करून दिली. या दोन्ही फलंदाजांनी पॉवरप्लेमध्ये कोलकाताला कोणतेही यश मिळवू दिले नाही आणि पहिल्या विकेटसाठी ८१ धावा जोडल्या. वैभवने २८ चेंडूंमध्ये ६ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ४६ धावा केल्या, तर यशस्वी चार चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २९ चेंडूंमध्ये ३९ धावा करून बाद झाला. या दोघांव्यतिरिक्त केवळ शिमरॉन हेटमायर (१२) आणि रियान पराग (१२) यांनाच दुहेरी आकडा गाठता आला. बाकीचे सर्व फलंदाज फेल ठरले. या लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकाताची फलंदाजी खूपच खराब झाली आणि संघाने ८५ धावांवर सहा गडी गमावले. जोफ्रा आर्चरने पहिल्याच चेंडूवर टीम सेफर्टला तंबूत पाठवले आणि त्यानंतर दुसऱ्याच षटकात नंद्रे बर्गरने कर्णधार अजिंक्य रहाणेची विकेट घेतली. कोलकाताचे दोन्ही सलामीचे फलंदाज आपले खातेही उघडू शकले नाहीत. यानंतर संघाने नियमित अंतराने कॅमेरॉन ग्रीन (२७), अंगकृश रघुवंशी (१०), रोव्हमन पॉवेल (२३) आणि रमणदीप सिंग (१०) यांच्या विकेट गमावल्या.

त्यावेळी कोलकाता संघ अडचणीत दिसत होता. सहा गडी बाद झाल्यानंतर रिंकू सिंगने अनुकूल रॉयसोबत सातव्या विकेटसाठी ३७ चेंडूंमध्ये ७६ धावांची नाबाद भागीदारी केली. कोलकातासाठी रिंकू सिंगने अर्धशतक झळकावले आणि संघाला विजय मिळवून दिल्यानंतरच तो पॅव्हेलियनमध्ये परतला.रिंकूने ३४ चेंडूंमध्ये नाबाद ५३ धावा केल्या.

## पंजाबची लखनौवर ५४ धावांनी मात

■ न्यू चंदीगड

**प्रियांश** आर्यने ९३ धावा आणि कूपर कॉनोलीने ८७ धावांची वादळी खेळी केल्यामुळे आज पंजाब किंग्सने लखनौ सुपर जायंट्सला ५४ धावांनी मात दिली. या विजयासह पंजाब किंग्सने ११ गुणांसह अव्वल स्थान कायम ठेवले. न्यू चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या २९ व्या सामन्यात पंजाब किंग्सने लखनौला विजयासाठी २५५ धावांचे भले मोठे लक्ष्य दिले होते. मात्र ते लखनौला पेलवले नाही आणि संपूर्ण संघ ५ बाद २०० धावांपर्यंतच पोहोचू शकला.

प्रथम फलंदाजी करताना पंजाबच्या प्रभसिमरन सिंगला खाते उघडण्यापूर्वीच मोहम्मद शामीने तंबूत धाडले. त्यानंतर प्रियांश आर्य आणि कूपर कॉनोली या जोडीने लखनौच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी आपल्या संघाची धावसंख्या १३.१ षटकांत १८५ वर पोहोचवली. कॉनोली ४६ चेंडूंत ८७ धावा आणि प्रियांश केवळ ३६ चेंडूंत ९३ धावा करून बाद झाला. श्रेयस अय्यरने ५, मार्कस स्टोइनिसने २९, नेहल वाढेराने १३, शशांक सिंगने १७, मार्को जानसेनने नाबाद १ धावा केल्यामुळे पंजाबने ७ बाद २५४ धावांपर्यंत मजल मारता आली. पंजाबच्या ज्या गतीने फलंदाजी केली त्या गतीने लखनौच्या फलंदाजांना फटकेबाजी करता आली नाही. त्यामुळे हा संघ २०० धावांपर्यंत पोहोचल्याने पंजाबने ५४ धावांनी विजय मिळवला.

## कॅरम स्पर्धेत जैतापूरचा आर्यन राऊत विजेता

■ मुंबई

**आनंदराव** अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्तच्या पहिल्या टप्प्यातील निवड चाचणी शालेय कॅरम स्पर्धेत राष्ट्रीय दर्जाचा सबज्युनियर कॅरमपटू जैतापूरच्या आर्यन राऊतने विजेतेपद पटकाविले. प्रथमपासून अचूक खेळ करणाऱ्या जैतापुरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या आर्यन राऊतने चेम्बूरमधील श्री नारायण गुरु हायस्कूलच्या उमैर पठाणचे आव्हान ११-० असे संपुष्टात आणले.

## आयएसपीएल, एमपीटी आणि सीजीएसटी संघांची विजयी सलामी

■ मुंबई

**क्रीडाप्रेमी** आमदार सुनील राऊत यांच्या संयोजनाखाली सुरु झालेल्या आमदार चषक कबड्डी स्पर्धेच्या पहिल्या दिवशी पुरुषांच्या व्यावसायिक गटात आयएसपीएल, सीजीएसटी, मुंबई पोर्ट ट्रस्ट संघांनी खणखणीत विजयाची नोंद केली तर महिलांच्या राज्यस्तरिय कबड्डी स्पर्धेत श्रीराम (पालघर), धर्मवीर (नंदुरबार) आणि स्वस्तिक कबड्डी संघांनी दणदणीत विजयासह जबरदस्त सलामी दिली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजन कबड्डीच्या मॅटसंग्रामाचे विक्रोळी पूर्वेला टागोर नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात उभारलेल्या क्रीडानगरीत शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या हस्ते दिमाखदार उद्घाटन पार पडले. यावेळी क्रीडाप्रेमी आमदार व संयोजक सुनील राऊत, माजी आमदार रमेश कोरगावकर, बाबा कदम, दीपक सावंत, विश्वास शिंदे, महिला विभाग प्रमुख रश्मी पहुडकर तसेच मुंबई उपनगर कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष सुधाकर घाग उपस्थित होते.

या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी बहुतांश लढती एकतर्फीच झाल्या. इन्शुअरकोट स्पोर्ट्स प्रा.लि. (आयएसपीएल) संघाने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत रूपाली ज्वेलर्सचा ६०-२१ असा धुव्वा उडवला.

## स्वराज्य स्पोर्ट्स व श्रीराम क्रीडा विश्वस्तने मावळी मंडळ चषक पटकाविला

■ ठाणे

**महिलांत** स्वराज्य स्पोर्ट्स आणि पुरुषांत श्रीराम क्रीडा विश्वस्त यांनी श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३व्या कबड्डी स्पर्धेत अंतिम विजेतेपद मिळविले. स्वराज्य स्पोर्ट्सची याशिका पुजारी व श्रीराम क्रीडा विश्वस्तचा तुषार शिंदे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले.

ठाणे येथील श्री मावळी मंडळाच्या पटांगणावर संपन्न झालेल्या महिलांच्या अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या अंतिम सामन्यात उपनगरच्या स्वराज्य स्पोर्ट्सने पूर्वार्धातील १३-१७ अशा पिछाडीवरून पालघर(विरार)च्या विवेक स्पोर्ट्सचा प्रतिकार ३७-३३ असा मोडून काढत श्री मावळी मंडळ चषक आपल्याकडे खेचून आणले. हरजीत, स्वीटी, सौंदर्या यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर विवेक स्पोर्ट्सने पूर्वार्धात लोण देत ४ गुणांची आघाडी मिळविली होती. पण उत्तरार्धात त्यांना आपल्या खेळात सातत्य राखणे जमले नाही. उत्तरार्धात याशिका पुजारी, समृद्धी मोहिते यांनी आपला खेळ गतिमान करत चढाईत भराभर गुण घेत लोणची परतफेड केली. त्यांना प्रतीक्षा तांडेलने उत्कृष्ट पकडी करत छान साथ दिली. म्हणूनच शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून धरणाऱ्या या सामन्यात स्वराज्यला सरशी साधता आली. पुरुषांच्या अंतिम सामन्यात श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने ठाण्याच्या ग्रीफिन्स जिमचा ३६-३० असा पराभव केला.

## इंटर मियामीचा विजय

■ न्यूयॉर्क

**लिओनेल** मेस्सीच्या नेतृत्वाखाली इंटर मियामीने कोलोरॅडो रॅपिड्सवर ३-२ असा रोमांचक विजय मिळवला. हा सामना एम्पॉवर फील्ड ट माईल हायमध्ये ७५,८२४ प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळला गेला, जी मेजर लीग सॉकरच्या इतिहासातील दुसरी सर्वात मोठी प्रेक्षकसंख्या होती. कर्णधार लिओनेल मेस्सीने दोन गोल करून मायामीच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

## आयुष आयपीएलमधून तीन आठवडे बाहेर

■ चेन्नई

**आयपीएल** स्पर्धेत ५ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावणाऱ्या चेन्नई संघाचा आयुष म्हात्रे दुखापतग्रस्त झाल्याने चेन्नई सुपर किंग्जला धक्का बसला आहे. तो ३ आठवडे आयपीएलच्या स्पर्धेतून बाहेर झाला आहे. तो थेट १० मे नंतर खेळताना दिसणार आहे. चेन्नईने आतापर्यंत ६ सामने खेळले आहेत, यादरम्यान २ सामने जिंकले आहेत. तर ४ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Public Notice**

The following Power consumer and area covered under 100kV Khopoli Substation in EHV (O&M) Dn., Panvel are informed that, the power supply of the following power lines will be shut down on **Tuesday Dt. 21.04.2026** for 22kV main Bus Rph damaged Conductor replacement work & Bus Isolator maintenance work. Please co-operate.

| Sr. No. | Substation | | Feeder No. | Date & Time | Areas |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 100/22kV Khopoli Substation | 22kV Bus section-2 | 22kV Khopoli Industrial | On dt. 21.04.2026 From 10:00 Hrs. to 18:00 Hrs. | Khopoli MIDC area and some Khopoli city area like wasrang |
| 2 | | | 22kV Shilphata | | Shilphata residential and commercial area and nearby MIDC and villages |
| 3 | | | 22kV Kharsundi | | Khalapur Industrial Area and surronding villages |
| 4 | | | 22kV Sawroli | | 22kV Savroli Switching Station |
| 5 | | | 22kV Rural | | Pali phata and nearby villages |

Sd/-
EXECUTIVE ENGINEER, E.H.V.(O&M) DN. PANVEL

बृहन्मुंबई महानगरपालिका
मु. अभि. (सां.प्र.) विभाग
क्र. का.अ.यां./सांडपाणी/३९५ शहर-१ दि. १७ एप्रिल, २०२६

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त खालील ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदा प्रत महाटेंडर पोर्टल (http://mahatenders.gov.in/nicgep/app) वर 'e-procurement' विभागामधून डाऊनलोड करता येईल.

| अ. क्र. | कामाचा तपशील | निविदा संदर्भ क्र. | ईरअ रु. मध्ये | निविदा किंमत रु. मध्ये | निविदा भरण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | माटुंगा, माहीम आणि वडाळा पंपिंग स्टेशन येथे ५ टन ईओटी क्रेन्सची दुरुस्ती, सुधारणा, चाचणी आणि कार्यान्वयन व त्यासह संलग्न कामे. | निविदा आयडी: २०२६_बृमुंमपा_१२१५३६१_१ | १५,५००/- | ३,९९३/- + १८% जीएसटी | २९.०४.२०२६ सायं. ०४.०० वा. |

अधिक तपशिलाकरिता http://mahatenders.gov.in/nicgep/app वर लॉग ऑन करा.

सही/-
कार्य. अभि. यांत्रिक (सांडपाणी) शहर - I

पीआरओ/१६/जाही/२०२६-२७

खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.

# सुख शांती समाधान

# वर्क फ्रॉम होम करताय? तर हे लक्षात घ्या...

**कोरोना काळापासून काही कंपन्यांनी घरून काम करण्याची मुभा दिली होती. त्यामुळे आता घरून काम करण्याची सवय बहुतेकांना लागली आहे. परंतु घरातील वातावरणात ऑफिससारखी एकाग्रता आणि ऊर्जा राखणे हे अनेकदा आव्हानात्मक असते. वास्तुशास्त्रानुसार, आपल्या सभोवतालची ऊर्जा आपल्या कामाच्या गुणवत्तेवर आणि करिअरच्या वाढीवर थेट परिणाम करते. जर तुम्ही घरून काम करत असाल आणि तुम्हाला थकवा जाणवत असेल, मानसिक ताण येत असेल किंवा तुमच्या करिअरमध्ये अडथळा येत असेल, तर त्याचे कारण तुमच्या कार्यक्षेत्रातील वास्तुदोष असू शकते.**

वास्तूमध्ये दिशाला विशेष महत्त्व आहे. चुकीच्या दिशेने बसून काम केल्याने एकाग्रता कमी होते. घराचा उत्तर किंवा ईशान्य कोपरा कामासाठी सर्वात शुभ मानला जातो. कुबेरची उत्तर दिशा आहे, जी नवीन संधी आणि संपत्तीच्या आगमनाची प्रेरणा देते. तुम्ही मार्केटिंग किंवा सेल्समध्ये असाल तर पश्चिम दिशा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. कारण ती नफा आणि लाभाची दिशा आहे. काम करताना उत्तर किंवा पूर्वेकडे तोंड करावे. कधीही दक्षिणेकडे तोंड करून बसू नका, स्पोर्ट्स यामुळे मानसिक तणाव वाढू शकतो.

तुमचा टेबल हा केवळ फर्निचरचा तुकडा नसून तुमच्या यशाचा आधार आहे. वास्तूनुसार तुमचे टेबल आयताकृती किंवा चौकोनी असावे. एल-आकाराचे किंवा गोल टेबल टाळा. कारण ते ऊर्जेच्या प्रवाहात व्यत्यय आणतात. लाकडी टेबल सर्वोत्तम मानले जातात. काच किंवा धातूचे टेबल टाळले पाहिजे. कारण ते अस्थिरता निर्माण करतात. रद्दी, जुनी बिले किंवा निरुपयोगी कागदपत्रे टेबलावर ठेवू नका. गोंधळलेले टेबलदेखील मेंदूमध्ये गोंधळ निर्माण करते. तुमची खुर्ची केवळ आरामदायी नसून वास्तू अनुकूलही असावी. तुमच्या खुर्चीच्या मागे एक भक्कम भिंत असावी. खिडकीकडे तोंड करून बसू नका, यामुळे आत्मविश्वास कमी होतो. जर मागे भिंत नसेल तर तिथे उंच पडदा लावा.

वाढीसाठी उच्च पाठ असलेली खुर्ची निवडा. हे तुम्हाला तुमच्या करिअरमध्ये चांगले समर्थन आणि स्थिरता प्रदान करते.

गडद किंवा अंधुक प्रकाश असलेल्या खोलीत काम केल्याने नकारात्मक ऊर्जा आणि आळशीपणा वाढतो. तुमच्या कार्यक्षेत्रात नैसर्गिक प्रकाश ठेवण्याचा प्रयत्न करा. ताजी हवा आणि प्रकाश 'जीवन ऊर्जा' देतात. तुम्ही डेस्क दिवा वापरत असल्यास, तो टेबलच्या आग्नेय कोपऱ्यात ठेवा. ही आगीची दिशा आहे, जी प्रकाश आणि वायुवीजन गडद किंवा खराब



प्रकाश असलेल्या खोलीत काम केल्याने नकारात्मक ऊर्जा आणि आळशीपणा वाढतो.

**टीप**- या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

## सीतानवमी अशी साजरी करा...

सीता नवमीचा उत्सव २५ एप्रिल २०२६ रोजी साजरा केला जाईल. पंचांगानुसार, वैशाख शुक्ल नवमी तिथी २४ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७.२१ वाजता सुरू होत आहे. ही तारीख २५ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ६.२७ वाजता संपत आहे. माता सीतेचा जन्म वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या तिथीला पुष्य नक्षत्राच्या मध्यरात्री झाला. सीता नवमी मध्यान्ह मुहूर्त १०.५८ ते ०१.३४ आहे.

सीता नवमीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. त्रेतायुगात भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांनी अनुक्रमे राम व सीता म्हणून जन्म घेतला. या दिवशी प्रभू राम व माता सीतेची पूजा केल्याने सर्व संकटे दूर होतात, जीवनात सुख-शांती येते आणि व्यक्तीला मोक्षही प्राप्त होतो. याशिवाय या व्रतामुळे वैवाहिक जीवनही मजबूत होते. कारण भगवान श्री राम आणि माता सीता यांचा जन्म एकाच नक्षत्रात झाला असे मानले जाते. त्यामुळे रामनवमीनंतर सीता नवमीची पूजा करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. सीता नवमीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करावे. गंगाजलाने पूजास्थान स्वच्छ करून तेथे प्रभू राम आणि माता सीता यांची मूर्ती स्थापित करा. कुंकू, चंदन, अक्षता, फुले, फळे, मिठाई, धूप आणि दिवा इत्यादी अर्पण करा आणि त्यानंतर माता सीता आणि भगवान रामाची आरती करा. त्यानंतर सीता नवमी व्रत कथेचा पाठ वाचावा. दिवसभर उपवास करताना देवाचे ध्यान करावे. संध्याकाळी पुन्हा पूजा करा आणि प्रसाद वाटप करा. ज्या स्त्रिया या दिवशी व्रत करतात आणि माता सीतेची पूजा करतात, त्यांना देवी सीतेप्रमाणे सहिष्णुता, त्याग आणि समर्पणाचे आशीर्वाद मिळतो, असे मानले जाते.

'श्री जानकी' या मंत्राचा जप करा. 'रामभयन नमः' चा १०८ वेळा जप करा. या दिवशी केवळ माता सीतेचीच नव्हे तर भगवान श्रीरामाचीही पूजा अत्यंत फलदायी मानली जाते. त्यांची एकत्रित पूजा करावी.



**ज्योतिषशास्त्रानुसार पुष्य नक्षत्र हे एक अतिशय शुभ नक्षत्र मानले जाते. पुष्य नक्षत्रास नक्षत्रांचा राजा देखील म्हणतात. या नक्षत्रात धनाची देवी लक्ष्मीमाता प्रकट झाली होती, असेही म्हटले जाते. जेव्हा हे नक्षत्र गुरुवारच्या दिवशी येते तेव्हा या संयोगाला गुरु पुष्य योग म्हणतात. गुरुवारी पुष्य नक्षत्र आल्यास गुरुपुष्यामृत योग होतो, असे म्हणतात.**

ज्योतिषशास्त्रानुसार, गुरुवार हा गुरू ग्रहाद्वारे नियंत्रित केला जातो. तसेच हा सर्वात फायदेशीर ग्रह देखील आहे. म्हणूनच गुरु पुष्य युती अत्यंत शुभ मानली जाते. यास गुरु पुष्य नक्षत्र योग, गुरु पुष्य अमृत योग असेही म्हणतात.

श्रावण महिन्यात गुरुपुष्यामृत योग कधी आहे, याचा कालावधी किती तास असणार आहे?, या काळात काय करावे आणि कोणते लाभ मिळतील? याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊया..

गुरुपुष्यामृत योग हा अत्यंत शुभ मानला जातो, ज्या दिवशी नवीन कार्य, सोन्या-चांदीची खरेदी आणि लक्ष्मीची पूजा करणे फलदायी ठरते. या दिवशी




पहाटे स्नान करून लक्ष्मी-विष्णूची पूजा करावी, पिवळे वस्त्र परिधान करावे आणि लक्ष्मीच्या मंत्रांचा जप करावा. लक्ष्मीला हळद, केशर अर्पण करणे शुभ मानले जाते.

सोने, चांदी, जमीन, मालमत्ता किंवा नवीन वाहने खरेदी करण्यासाठी हा काळ अत्यंत शुभ आहे.

लक्ष्मी माता आणि भगवान विष्णूची पूजा करावी. महालक्ष्मी मंत्रांचा १०८ वेळा जप करा.

गरजूंना अन्न, वस्त्र किंवा पैशांचे दान करा. या दिवशी केलेली सेवा वाया जात नाही, असे मानले जाते.

नवीन व्यवसाय, शिक्षण किंवा गुंतवणुकीची सुरुवात करणे अत्यंत शुभ मानले जाते.

गुरुवारी पुष्य नक्षत्र असल्यास घरात हळकुंड, लवंग किंवा पाच गोमती चक्र आणून पूजाघरात ठेवल्याने लक्ष्मी प्रसन्न होते.

हा योग गुरु आणि पुष्य नक्षत्र यांच्या संयोगामुळे बनतो आणि आर्थिक वृद्धीसाठी विशेष मानला जातो.

गुरुपुष्यामृत योग- २३ एप्रिल २०२६ गुरुवारी रात्री ०८.५७ पासून पहाटे ०६.१७ वाजेपर्यंत गुरुपुष्यामृत योग असणार आहे. गुरुपुष्यामृत योगामध्ये केलेल्या कामामुळे धन, समृद्धी आणि आर्थिक लाभ मिळतात, असे मानले जाते. नवीन व्यवसाय, गुंतवणूक, खरेदी आणि महत्त्वाच्या कामांचा शुभारंभ करण्यासाठी शुभ दिवस मानला जातो.

या दिवशी पहाटे उठून स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करा. घरातील देव्हाऱ्यामध्ये तुपाचा दिवा लावावा. लक्ष्मीमातेसह सर्व देवांना फळ, पुष्प, गंध, नैवेद्य अर्पण करून पूजा करावी.

लक्ष्मीमातेच्या मंत्राचा १०८ वेळा जप करावा. या दिवशी नकारात्मक वागणे आणि कार्य टाळा. मांस तसेच मद्य सेवन करणं टाळा. वादविवाद करणं टाळावे.

# अकोल्यात लव्ह जिहादमुळे एका हिंदू महिलेचा बळी

■ अकोला

**राज्यात** महिलांवरील अत्याचाराचे आणखी एक प्रकरण अकोल्यातून समोर आले आहे. प्रेमाच्या जाळ्यात ओढून एका नवविवाहितेचे अपहरण, तिचे बळजबरी धर्मांतर आणि अखेर तिची निर्घृण हत्या करून मृतदेह पेटवून दिल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणावरून भाजपाचे राज्यसभेतील खासदार अनिल बोंडे यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, हा लव्ह जिहादचा प्रकार असल्याचा आरोप केला आहे.

पीडित महिला मंगरुळपीर तालुक्यातील नांदखेडा येथे राहत होती. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी तिचे वर्धा येथील एका तरुणाशी लग्न झाले होते. मात्र लग्नानंतर काही आठवड्यांतच तिच्या आयुष्याला भीषण वळण लागले. पीडित महिलेची गावातील सादिक शाह नावाच्या तरुणाशी लग्नाआधी मैत्री होती. पीडितेचे लग्न झाल्यानंतर तो सुमारे एक महिन्याने वर्ध्यात पोहोचला आणि त्याने तिच्याशी पुन्हा संपर्क

### खा.अनिल बोंडे यांचा आरोप

साधला. काही दिवसांनी तिची दिशाभूल करून त्याने तिचे अपहरण केले आणि तो तिला मुंबईला घेऊन गेला. त्यानंतर सुमारे आठ महिने ते दोघे मुंबईत विविध ठिकाणी भाड्याने खोल्या घेऊन राहिले. दरम्यानच्या काळात पीडितेला गर्भधारणा झाली. त्यानंतर सादिक तिला पुन्हा अकोल्याला घेऊन आला.

२८ मार्च रोजी पीडितेने एका बाळाला जन्म दिला. मात्र बाळंतपणानंतर अवघ्या सहाव्या दिवशी ६ एप्रिल रोजी तिची हत्या करण्यात आली. तिचा मृतदेह अकोल्यातील डाबकी रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका मोकळ्या मैदानात विवस्त्र आणि अर्धवट जळालेल्या अवस्थेत स्थानिकांना आढळून आला. पुरावा नष्ट करण्यासाठी तिच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. खा. बोंडे यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला. पीडितेचे धर्मांतर करून तिचे नाव बदलण्यात आले. तिला मानसिक आणि शारीरिक यातना दिल्या गेल्या आणि शेवटी तिची हत्या करण्यात आली. हे केवळ एकट्या सादिकचे काम नाही. त्याच्या कुटुंबियांचाही यामध्ये समावेश आहे, असा आरोप बोंडे यांनी केला. आरोपींवर मकोकाअंतर्गत कारवाई करावी आणि सादिक आणि त्याच्या कुटुंबियांची नार्को चाचणी करावी, अशी मागणी बोंडे यांनी केली.

# चिंचणी गावाच्या स्मशानभूमीत भरणार अनोखे साहित्य संमेलन

■ तासगाव

**सांगली** जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील चिंचणी येथील स्मशानभूमीच्या शांत, निसर्गरम्य परिसरात चक्क साहित्य संमेलन आयोजित केले आहे. रविवार २६ एप्रिल रोजी 'शब्दपालवी साहित्य संमेलन' हा आगळावेगळा साहित्य सोहळा या स्मशानभूमीत पार पडणार आहे.

प्रा.किशोर पाटील यांच्या 'आपलं साहित्य, आपलं संमेलन' या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला आहे. पाटील यांनी सांगितले की, मोठ्या साहित्य संमेलनांमध्ये अनेक कवी, लेखक, वक्ते यांना व्यासपीठ मिळत नाही. त्यांच्या प्रतिभेला वाव मिळावा, साहित्याला नवी ऊर्जा मिळावी आणि गावागावातील लिहित्या हातांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

हे शब्दपालवी साहित्य समेलन चिंचणीतील स्मशानभूमीत रविवार २६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. या संमेलनाचे युट्यूबवर थेट प्रक्षेपण होणार आहे. संमेलनात सहभागी होण्यासाठी नामांकित साहित्यिक असण्याची गरज नाही.

# पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडून ८ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ मिरा रोड

**पाण्याने** भरलेल्या खड्ड्यात पडून ८ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. मिरा रोडच्या नयानगर परिसरात ही घटना घडली. बिलाल शेख हा मुलगा नया नगर येथे राहत होता. तो मिरा रोडमधील अंजुम शाळेत तिसऱ्या इयत्तेत शिकत होता. शनिवारी संध्याकाळी तो खेळायला गेला होता. मात्र बराच वेळ झाला तरी घरी आला नव्हता. त्याचा शोध सुरू असता तो नया नगर परिसरातील मॉल जवळील पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडल्याचे समजले. अग्निशमन दलाच्या मदतीने रात्री ८ वाजता त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. मॉलच्या बांधकासाठी हा खड्डा खणण्यात आला होता. मात्र तेथे कुठलीही सुरक्षा व्यवस्था नव्हती. यामुळे स्थानिकांनी संताप व्यक्त केला असून संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

# शिवशाहीच्या विकासकांवर शासन मेहरबान! भाडे व व्याजात सवलत

■ मुंबई

**शिवशाही** पुनर्वसन प्रकल्पअंतर्गत असलेल्या घरांचे ११६ कोटी रुपये भाडे थकविणाऱ्या खासगी विकासकांवर राज्य शासन मेहरबान झाले आहे. त्यांच्या भाडे व व्याजाच्या रकमेत सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यामुळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या तिजोरीला १९ कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसणार आहे, अशी माहिती हाती आली आहे. उपनगरच्या विविध भागांत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाने पीटीसीअंतर्गत अनेक इमारती बांधलेल्या आहेत. पाच खासगी विकासकांनी एसआरए योजनेतील रहिवाशांना राहण्यासाठी ६५० घरे शिवशाही कार्यालयाकडून ८ हजार रुपये दरमहा भाड्यावर घेतली आहेत. या विकासकांनी गेले अनेक वर्षांपासून भाडे भरणा न केल्याने १६ टक्के व्याजासह ही रक्कम ११६ कोटींवर पोहोचली आहे, अशी माहिती देऊन शिवशाहीतील एक कर्मचारी पुढे म्हणाला, नुकतीच बोर्ड मिटिंग झाली. त्यात शासनाने असे निर्देश दिले की, भाड्याच्या रकमेत १० टक्के व १६ टक्के व्याजाच्या रकमेत ८ टक्के कपात करण्यात यावी व त्याप्रमाणे तीन महिन्यात थकीत भाड्याची रक्कम विकासकांकडून वसूल करावी.

# भाईंदरमध्ये श्रेयवादाची लढाई सुरूच सरनाईकांपाठोपाठ मेहतांचाही दरबार

■ भाईंदर

**परिवहन** मंत्री प्रताप सरनाईक यांनी भाईंदरमध्ये जनता दरबाराचे आयोजन केल्यानंतर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांनीदेखील जनता दरबाराचे आयोजन केले आहे. सरनाईक यांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे या दरबाराच्या माध्यमातून चव्हाट्यावर आणण्याचा मेहता यांचा प्रयत्न आहे.

शिवसेना नेते परिवहन मंत्री प्रताप सरनाई आणि भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांच्यातील वाद वाढला आहे. कामाचे श्रेय घेण्यात चढाओढ, एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू असतात. महापौर डिंपल मेहता यांनी जनता दरबार घेतल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी नुकताच जनता दरबार घेतला होता. सरनाईकांच्या जनता दरबाराला प्रतिसाद मिळाल्याने आमदार नरेंद्र मेहता यांनी देखील जनता दरबार जाहीर केला आहे. २२ एप्रिल रोजी मिरा रोडच्या भाजपा जिल्हा कार्यालयात हा दरबार भरणार आहे.

सरनाईक यांच्या जनता दरबारातून नरेंद्र मेहता यांच्याविरोधातील फसवणुकीचे एक प्रकरण हेतूपरस्सर बाहेर काढण्यात आल्याचा भाजपाचा आरोप आहे. सरनाईक यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढण्याचा इशारा मेहता यांनी दिला आहे. या दरबाराचे निमित्त साधून मेहता सरनाईक यांची कुठली प्रकरणे बाहेर काढतात त्याकडे लक्ष लागले आहे.

### भ्रष्टाचार प्रकरणे बाहेर काढणार


**INDUSIND BANK LTD.**

Regd Office: 2401, Gen.Thimmayya Road, Cantonment, Pune – 411 001.
Secretarial & Investor Services : 701 Solitaire Corportate Park, 167 Guru Hargovindji Marg. Andheri East, Mumbai – 400093

**NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE(S)**

Notice is hereby given that the certificate(s) of IndusInd Bank Ltd. for the under mentioned securities are stated to have been lost or misplaced and the registered holders have applied to the Bank for issue of duplicate Share certificate(s). Any person who has /have a claim(s) in respect of the said security(ies) should lodge such claim(s) in writing with R & T Agents of Bank viz. **MUFG Intime India Private Limited(Formerly known as Linkintime India Private Limited).** C- 101, 247 Park, L.B.S. Marg, Vikhroli West, Mumbai – 400083 within **7 (Seven)** days from this date else the company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| Sr. No. | Name of the Shareholder | Registered Folio. No. | Certificate No. | Distinctive No's | | No. of Shares |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | GOPINATH N<br>MRS N PRAMILA<br>(1st joint Deceased) | 00702333 | 636290 | 220858533 | 220861094 | 2562 |

(AUTHORISED SIGNATORY)
sd/-
INDUSIND BANK LIMITED

Place : Mumbai
Date : 20.04.2026

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**

Municipal Bank Bhavan, 245, P. D'mello Road, Fort, Mumbai –400001.
Tel. 91-22-2261 3814/ 91-22-22717800/858/852
Email: mcb.itcell@mcbmumbai.com

**Tenders are invited for "Renewal of Annual Software Update License & Support –IBM Websphere MQ (280) units for RTGS/NEFT Project."**

The Municipal Co-Operative Bank Ltd, Mumbai invites request for proposal **Renewal of Annual Software Update License & Support –IBM Websphere MQ (280) units for RTGS/NEFT Project.** Tender to be downloaded from the Bank's following Website: **www.mcb.bank.in** Eligible vendor will be selected based on the RFP response received by the bank. Tender to be submitted to the Bank on or before 02nd May 2026 upto 5.00 PM.

Place: Mumbai  -sd/-
Date: 20/04/2026  General Manager

**जाहीर सूचना**

संदर्भः मान. अपर जिल्हाधिकारी आणि अपीलीय अधिकारी, पूर्व, चर्चगेट, मुंबई येथे
अर्ज क्र. १०३५ वर्ष २०२६
(महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास कायदा, १९७१ च्या कलम ३५ अन्वये)

१. ग्रेसियन सायप्रियन रोचा
पाली परेरा वाडी, टीपीएस ३० वा रस्ता, पाली नाका, वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०. ...याचिकाकर्ता

विरुद्ध

१. अपर जिल्हाधिकारी अतिक्रमण व निष्कासन, मुंबई उपनगर जिल्हा
२. उप जिल्हाधिकारी / सक्षम प्राधिकारी II, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई, मुंबई शहर
कार्यालय - झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (प), मुंबई - ४०००५१.
३. पाली परेरा वाडी सीएचएस
टीपीएस ३०वा रस्ता, पाली नाका, वांद्रे (प), मुंबई - ४०००५०.
४. माहिलाल बी. रझाक
पाली परेरा वाडी सीएचएस, टीपीएस ३०वा रस्ता, पाली नाका, वांद्रे (प), मुंबई - ४०००५०. ... प्रतिवादी

प्रति,
महोदय/महोदया
नोंद घ्यावी की, यामधील ग्रेसियन सायप्रियन रोचा यांच्या नावे असलेल्या संरचनेच्या पात्रतेकरिता उपरोल्लेखित याचिका (परिशिष्ट-II दि. ०१.०८.२००६ रोजी पारित करण्यात आले होते) प्रतिवादी क्र. ४ म्हणजेच माहिलाल बी. रझाक यांचे नाव वगळणे आणि त्या जागी अर्जदाराचे नाव जोडणे आणि निवासी कारणाकरिता पात्र असे घोषित करणे याकरिता विनंतीसह परिशिष्ट-II, अ. क्र. ११ मध्ये पात्रतेकरिता याचिका दाखल करण्यात आली आहे. उपरोल्लेखित याचिका मान. अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पूर्व उपनगर, चर्चगेट, पत्ताः पहिला मजला, औद्योगिक हमी इमारत, चर्चगेट रेल्वे स्टेशन शेजारी, चर्चगेट मुंबई यांच्यासमक्ष दाखल करण्यात आली आहे आणि उपरोल्लेखित प्रकरण दि. १४.०५.२०२६ रोजी स. ११.०० वा. आणि त्यानंतर सुनावणीकरिता घेण्यात येईल. म्हणून, कृपया उपरोल्लेखित प्रकरणाच्या सुनावणीस सदर दिनांक आणि वेळेस उपस्थित रहावे, उपस्थित न राहिल्यास, प्रकरणाची गुणवत्तेनुसार सुनावणी करण्यात येईल.
मान. अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पूर्व उपनगर यांनी वृत्तपत्र प्रसिद्धीद्वारे सूचना पारित करण्याचे निर्देश दिले आणि पुढील दिनांक १४.०५.२०२६ आहे.
धन्यवाद.

आपला विश्वासू,
शिक्का
ग्रेसियन सायप्रियन रोचा
ॲडव्होकेट
नबी हुसैन शेख यांच्या द्वारे
पत्ताः पाली परेरा वाडी, टीपीएस ३० वा रस्ता, पाली नाका, वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०.
मोबा. क्र. ९८२०९८९२४८
दिनांकः २०.०४.२०२६
ठिकाणः मुंबई

**FOMENTO**

**फोमेन्टो रिसॉर्ट्स ॲण्ड हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड**
(पूर्वीची फोमेन्टो रिसॉर्ट्स ॲण्ड हॉटेल्स लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालयः सिदॅड दे गोवा, वैंगुईनिम बीच, गोवा-४०३ ००४, भारत.
दूर. क्र.: + ९१ ८३२ २४५४५४५ फॅक्स क्र.: + ९१ ८३२ २४५४५४१ / ४२, सीआयएन नं.: U55101GA1971PTC000113
ईमेलः shareholders@frhl.in, वेबसाइटः www.frhl.in

**सूचना**

**प्रदान न केलेले/दावा न केलेले लाभांश गुंतवणुकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी ("आयईपीएफ") मध्ये हस्तांतरित होण्यापासून रोखण्याकरिता केवायसी आणि इतर संबंधित अद्यतन आणि भागधारकांच्या सहभागाकरिता १०० दिवसांची मोहीम - "सक्षम निवेशक"**

फोमेन्टो रिसॉर्ट्स ॲण्ड हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड, पूर्वीची फोमेन्टो रिसॉर्ट्स ॲण्ड हॉटेल्स लिमिटेड ("कंपनी")च्या भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात येते की, गुंतवणुकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण ("आयईपीएफए"), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") पत्र दिनांक २७ मार्च, २०२६ च्या अनुषंगाने कंपनीने दि. ०१ एप्रिल, २०२६ ते दि. ९ जुलै, २०२६ पर्यंत १०० दिवसांची मोहीम - "सक्षम निवेशक" सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान सर्व भागधारकांनी, ज्यांनी त्यांच्या लाभांशावर दावा केलेला नाही किंवा त्यांचे केवायसी आणि नामनिर्देशन तपशील अद्ययावत केलेला नाही किंवा दावा न केलेल्या लाभांशाच्या संबंधात कोणतीही अडचण होत आहे त्यांनी कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") म्हणजेच मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांना त्यांचा पत्ताः बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, द्वाराः फोमेन्टो रिसॉर्ट्स ॲण्ड हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड, कार्यालय क्र. एस६-२, ६ वा मजला, पिनॅकल बिझनेस पार्क, अहुरा सेंटर शेजारी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३; ईमेल आयडीः investors@bigshareonline.com; दूर. ०२२-६२६३८२००, वेबसाईटः www.bigshareonline.com यांना लिहून कळवावे आणि तसेच कंपनीस ई-मेल आयडीः shareholders@frhl.in येथे ई-मेल पाठवावा. भागधारकांनी पुढे नोंद घ्यावी की, ही मोहीम सक्रियपणे आणि विशेषतः भागधारकांपर्यंत त्यांचे केवायसी, बँक आदेश, नामांकन आणि संपर्क माहिती इत्यादी अद्यतनित करण्यासाठी आणि त्यांच्या न भरलेल्या / दावा न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे, जेणेकरून त्यांची लाभांश रक्कम आयईपीएफएकडे हस्तांतरित होऊ नये.

फोमेन्टो रिसॉर्ट्स ॲण्ड हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडकरिता
सही/-
रविना जैन
कंपनी सचिव

दिनांकः २० एप्रिल, २०२६
ठिकाणः गोवा

रामेश्वर मीडिया

# चंदेरी च्विंगम

मुंबई। सोमवार
२० एप्रिल, २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## दीपिका-रणवीरची दुसरी गुड न्यूज



बॉलिवूडमधील लोकप्रिय जोडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंह यांनी नुकतीच एक बातमी जाहीर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यानुसार दीपिकाने सोशल मीडियावर आपल्या दुसऱ्या गर्भधारणेची घोषणा केली आहे. एका हृदयस्पर्शी इंस्टाग्राम पोस्टद्वारे तिने ही आनंदवार्ता सर्वांसोबत शेअर केली असून, यामध्ये त्यांची मुलगी दुआ देखील दिसत आहे. या घोषणेसाठी दीपिकाने अत्यंत साध्या पण तितक्याच भावूक मार्गाचा अवलंब केला आहे. तिने शेअर केलेल्या छायाचित्रात चिमुकली दुआ हातामध्ये प्रेग्नन्सी टेस्ट किट धरून असल्याचे दिसत आहे. आपल्या मुलांच्या गोपनीयतेची काळजी घेत दीपिकाने यावेळीही दुआचा चेहरा पूर्णपणे समोर आणलेला नाही. विशेष म्हणजे, या पोस्टसाठी तिने शब्दांचा वापर न करता केवळ दोन 'नजर बट्टू' चिन्हांचा वापर केला आहे. या एकाच छायाचित्राने सर्व काही स्पष्ट केले असून, अवघ्या काही मिनिटांतच हे वृत्त वाऱ्यासारखे पसरले.

दीपिका आणि रणवीर यांचा हा प्रवास नेहमीच कौतुकाचा विषय राहिला आहे. इटलीतील लेक कोमो येथे १४ आणि १५ नोव्हेंबर २०१८ रोजी हे दोन्ही कलाकार विवाहबंधनात अडकले होते. ८ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांच्या आयुष्यात कन्यारत्नाचे आगमन झाले. आता येणाऱ्या नवीन पाहुण्याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे.

## विक्रम भट्ट यांचा नवा थ्रीडी थरार



हिंदी चित्रपटसृष्टीतील भयपटांचे मास्टर मानले जाणारे दिग्दर्शक विक्रम भट्ट यांच्या आगामी थ्रीडी भयपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. अनेक वेळा प्रदर्शनाची तारीख लांबणीवर पडल्यानंतर, आता हा चित्रपट अखेर येत्या जून महिन्यात प्रदर्शित होणार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. सुरुवातीला हा चित्रपट २१ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार होता. चित्रपटाचा टीझर सप्टेंबरमध्ये प्रदर्शित झाला होता. परंतु प्रेक्षकांच्या प्रतिसादानंतर विक्रम भट्ट यांनी चित्रपटाच्या काही भागांचे पुन्हा चित्रीकरण करण्याचा निर्णय घेतला. प्रेक्षकांना अधिक वास्तववादी अनुभव मिळावा यासाठी सुमारे १२ दिवस प्रत्यक्ष लोकेशन्सवर चित्रीकरण करण्यात आले. यापूर्वी या भागांसाठी व्हीएफएक्सचा वापर करण्यात आला होता.परंतु तो पुरेसा नैसर्गिक वाटत नसल्याने भट्ट यांनी हा बदल केला.

विक्रम भट्ट यांनी असा दावा केला आहे की, हा चित्रपट भारतीय सिनेसृष्टीतील आतापर्यंतचा सर्वोत्तम 'थ्रीडी' अनुभव देणारा ठरेल. २०११ मधील 'हॉन्टेड थ्रीडी' या यशस्वी चित्रपटानंतर विक्रम भट्ट आणि अभिनेता मिमोह चक्रवर्ती ही जोडी पुन्हा एकदा या चित्रपटाच्या माध्यमातून एकत्र येत आहे. मिमोहसोबतच या चित्रपटात चेतना पांडे आणि इतर कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

## 'लाहोर १९४७' चे नाव बदलणार



बॉलिवूडमधील बहुप्रतिक्षित चित्रपट 'लाहोर १९४७' बाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. सनी देओलची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाचे नाव बदलून आता 'बटवारा १९४७' असे केले जाण्याची दाट शक्यता आहे. दिग्दर्शक राजकुमार संतोषी आणि निर्माते आमिर खान या चित्रपटाच्या नावाबाबत गांभीर्याने विचार करत असल्याचे सूत्रांकडून समजते.

हा चित्रपट १९८० मध्ये असगर वजाहत यांनी लिहिलेल्या 'जिस लाहोर नई देख्या' या प्रसिद्ध नाटकावर आधारित आहे. कथानक फाळणीच्या काळातील असून, एका मुस्लीम कुटुंबाभोवती फिरते, जे लखनौमधून लाहोरला स्थलांतरित होतात. सुरुवातीला चित्रपटाचे कथानक लाहोर शहरात घडत असल्याने 'लाहोर १९४७' हे नाव योग्य वाटले होते. मात्र, आता निर्मात्यांना असे वाटते की कथेचा आवाका पाहता 'बटवारा १९४७' हे नाव अधिक समर्पक ठरेल. सर्व संबंधितांच्या संमतीनंतर काही आठवड्यांतच या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब होऊ शकते. या चित्रपटाच्या निमित्ताने सनी देओल आणि राजकुमार संतोषी हे अनेक वर्षांनंतर एकत्र काम करत आहेत. तसेच आमिर खान या चित्रपटाचा निर्माता असून तो एका महत्त्वाच्या भूमिकेतही दिसणार आहे.

## 'राजेश खन्ना यांना अपयश पचवणं कठीण गेलं' : प्रेम चोप्रा

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते प्रेम चोप्रा यांनी अलीकडेच सुपरस्टार राजेश खन्ना यांच्याबद्दल काही धक्कादायक आणि भावुक खुलासे केले आहेत. चित्रपटसृष्टीतील यशाच्या शिखरावर राहिलेल्या राजेश खन्ना यांना नंतरच्या काळातील अपयश पचवणं कसं जड गेलं, यावर प्रेम चोप्रा यांनी प्रकाश टाकला. एका संवादादरम्यान प्रेम



चोप्रा यांनी सांगितले की, राजेश खन्ना यांनी बॉलिवूडमध्ये जे स्थान आणि लोकप्रियता अनुभवली होती, ती कमी झाल्यावर ते प्रचंड अस्वस्थ झाले होते. ते म्हणाले, राजेश खन्ना यांच्यासाठी अपयश स्वीकारणं आणि सर्वोच्च स्थानावरून खाली येणं हे अत्यंत कठीण होतं. यामुळे त्यांच्यात मोठ्या प्रमाणावर वैफल्य (फ्रस्ट्रेशन) निर्माण झालं होतं.

कलाकारांच्या मानसिक स्थितीवर भाष्य करताना प्रेम चोप्रा यांनी एक गंभीर निरीक्षण नोंदवले. ते म्हणाले, जेव्हा कलाकार यशाच्या शिखरावरून खाली येतात, तेव्हा ते एकतर मद्याच्या आहारी जातात किंवा टोकाचे पाऊल उचलून आपले जीवन संपवतात. राजेश खन्ना यांच्या बाबतीतही असेच काहीसे घडले आणि या नैराश्यातूनच ते मद्याकडे वळले, असे चोप्रा यांनी नमूद केले. राजेश खन्ना यांनी भारतीय सिनेसृष्टीला सलग १५ सुपरहिट चित्रपट देऊन जो इतिहास रचला होता, तो आजही अबाधित आहे.

## चित्रीकरण स्थळांवरील गैरसोयींबाबत अर्चनाची आगपाखड



चित्रपट आणि मालिकांच्या सेटवर काम करणाऱ्या कलाकारांच्या आणि तंत्रज्ञांच्या कामाचे तास तसेच तिथे मिळणाऱ्या मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. 'टोस्टर' या आगामी चित्रपटातील कलाकार राजकुमार राव, सन्या मल्होत्रा, अभिषेक बॅनर्जी आणि अर्चना पूरण सिंह यांनी एका चर्चेदरम्यान चित्रपटसृष्टीतील या गंभीर समस्यांवर प्रकाश टाकला आहे. ज्येष्ठ अभिनेत्री अर्चना पूरण सिंह यांनी सेटवरील विदारक परिस्थितीबद्दल संताप व्यक्त केला. त्या म्हणाल्या, शूटिंगचे तास निश्चित असूनही काम वेळेत संपत नाही. अनेकदा १२ तासांची शिफ्ट १३ ते १४ तासांपर्यंत ओढली जाते. इतके काम करूनही जेवणाची सुट्टी दिली जात नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे. ही एक प्रकारची मानसिकता आहे. जे 'लाईटमन' दिवसभर उन्हात अवजड उपकरणे घेऊन उभे असतात, त्यांना वेळेवर जेवण न मिळणे ही मोठी शोकांतिका आहे. काही निर्मिती संस्था तर जेवणाच्या बाबतीत इतकी काटकसर करतात की, चित्रपटसृष्टीत त्यांची ओळखच कंजूस म्हणून झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## अक्षय पुन्हा सूत्रसंचालकाच्या भूमिकेत



बॉलिवूडचा 'खिलाडी' अक्षय कुमार पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. 'व्हील ऑफ फॉर्च्युन इंडिया' या लोकप्रिय गेम शोच्या पहिल्या सीझनला मिळालेल्या स्थिर प्रतिसादानंतर, आता या शोच्या दुसऱ्या सीझनची तयारी सुरू असल्याची चर्चा मनोरंजन विश्वात रंगली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या शोच्या दुसऱ्या भागासाठी चॅनेलने हिरवा कंदील दाखवला असून, अक्षय कुमारच या शोचा चेहरा राहणार आहे.

हा शो प्रसिद्ध अमेरिकन गेम शो 'व्हील ऑफ फॉर्च्युन'चे भारतीय रूप आहे. मूळ अमेरिकन शो १९७५ मध्ये सुरू झाला असून, तो जगातील प्रदीर्घ काळ चालणाऱ्या गेम शोपैकी एक मानला जातो. भारतामध्ये या शोचा पहिला सीझन २७ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित झाला होता. अवघ्या काही महिन्यांतच या शोने प्रेक्षकांची पसंती मिळवली आहे. या शोच्या यशात अक्षय कुमारच्या सहजसुंदर आणि खेळकर सूत्रसंचालनाचा मोठा वाटा असल्याचे मानले जाते. स्पर्धकांशी साधलेला संवाद आणि त्याचा हजरजबाबीपणा यामुळे प्रेक्षकांमध्ये हा शो लोकप्रिय झाला. आता दुसऱ्या सीझनसाठीही निवड होणे, ही अक्षयसाठी आनंदाची बाब आहे. सध्या चॅनेल किंवा अक्षय कुमार यांच्याकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसली तरी, लवकरच हे चक्र पुन्हा एकदा फिरताना दिसण्याची चिन्हे आहेत.

# हेल्दी Me

## समस्या सेंसरिन्युअल हियरिंग लॉसची



प्रसिद्ध गायिका अलका याग्निक यांना झालेल्या दुर्मीळ आजारामुळे संगीत विश्वात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या आजाराला 'सेंसरिन्यूरल हियरिंग लॉस' अर्थात 'एसएनएचएल' असे संबोधले जाते. हा आजार प्रामुख्याने मानवी कानाच्या आतील भागाशी संबंधित असून, तो थेट श्रवणक्षमतेवर आघात करतो.

अलका याग्निक यांनी दिलेल्या मुलाखतीनुसार, २०२४ मध्ये विमान प्रवास करून उतरल्यानंतर त्यांना अचानक ऐकू येणे बंद झाले. वैद्यकीय तपासणीअंती असे निष्पन्न झाले की, एका विशिष्ट 'व्हायरल अटॅक'मुळे त्यांच्या श्रवणसंस्थेच्या नसांना इजा पोहोचली आहे.

या शारीरिक व्याधीमुळे सध्या त्या कोणतेही नवीन गायन प्रकल्प स्वीकारू शकत नाहीत. मात्र त्यांच्यावर योग्य उपचार सुरू आहेत.

अमेरिकन स्पीच लँग्वेज हियरिंग असोसिएशनच्या तांत्रिक व्याख्येनुसार, मानवी कानाचे बाह्य, मध्य आणि आतील असे तीन भाग असतात. जेव्हा कानाच्या आतील भागात किंवा तथून मेंदूकडे जाणाऱ्या मज्जातंतूंमध्ये बिघाड होतो, तेव्हा हा आजार बळावतो.

या आजाराची लक्षणे सुरुवातीला सौम्य वाटू शकतात. परंतु त्याकडे दुर्लक्ष केल्यास कायमस्वरूपी बहिरेपणा येण्याची दाट शक्यता असते. हळू आवाजातील संवाद ऐकण्यास त्रास होणे किंवा मोठ्या आवाजातील ध्वनी अस्पष्ट जाणवणे, ही या आजाराची प्राथमिक लक्षणे आहेत.

या आजाराची कारणे शोधल्यास असे लक्षात येते की, सतत मोठ्या आवाजात संगीत ऐकणे, गंभीर संसर्ग, विशिष्ट औषधांचे दुष्परिणाम किंवा अनुवंशिकता यामुळे ही समस्या उद्भवू शकते. त्याचप्रमाणे वाढते वय, डोक्याला बसलेला मार किंवा जन्मत: असलेले दोष हीदेखील 'एसएनएचएल'साठी कारणीभूत ठरू शकतात.

या आजारावर वेळीच उपचार घेतल्यास औषधांच्या सहाय्याने तो बरा होऊ शकतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये शस्त्रक्रिया हा पर्यायदेखील उपलब्ध असतो, मात्र उपचारांची दिशा ही रुग्णाची स्थिती आणि आजाराच्या तीव्रतेवर अवलंबून असते.

अलका यांनी आपल्या चाहत्यांना मोठ्या आवाजात गाणी ऐकण्यापासून सावध राहण्याचा सल्ला दिला आहे.

आधुनिक जीवनशैलीत कानाचे आरोग्य जपणे ही काळाची गरज बनली असून, कोणत्याही लहान लक्षणाकडे दुर्लक्ष न करता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अनिवार्य ठरते.

आरोग्य विश्वातील या घडामोडींमुळे श्रवणदोष आणि त्यावरील उपाययोजनांबाबत समाजात जनजागृती होणे आवश्यक आहे.

### हेल्दी टिप्स



वडीलधारी माणसे हरभरे खाणाऱ्यांचे शरीर निरोगी आणि बलवान होते असे सांगत असतात. चणे खाल्ल्याने मेंदू तल्लख होते. चण्यांमध्ये कार्बोहायड्रेट्स, प्रोटीन, स्निग्धता, फायबर्स, कॅल्शियम, लोह आणि अनेक जीवनसत्वे असतात. गर्भवतीला मळमळत असेल तर भाजलेल्या हरभऱ्याचे कढण पाजावे. चण्यांमुळे रक्तशुद्धी होते. तसेच केसगळती रोखण्यास मदत होते.



तज्ज्ञांच्या मते, आरोग्य उत्तम राहण्यासाठी सर्व जीवनसत्वे गरजेची असली तरी त्यातही 'क' जीवनसत्व अधिक महत्त्वाचे असते.

- दररोज ६५ ते ९० मिलीग्रॅम व्हिटॅमिन 'सी' घेणे कोणत्याही व्यक्तीसाठी पुरेसे असते. आपण १००० मिलीग्रॅमपेक्षा जास्त व्हिटॅमिन 'सी' घेतले तर ते आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.
- सामान्यत: स्त्रियांनी ७५ मिलीग्रॅम, पुरुषांसाठी ९० मिलीग्रॅम, गर्भवती महिलांसाठी ८५ मिलीग्रॅम आणि स्तनपान देणाऱ्या महिलांसाठी १२० मिलीग्रॅमपर्यंत व्हिटॅमिन 'सी' सेवन करावे.

## डीडीएच खुब्याच्या सांध्यांची समस्या



*डीडीएच खुब्याच्या सांध्यांची समस्या बॉलिवूड अभिनेता वरुण धवन याने आपल्या मुलीला, लाराला झालेल्या 'डीडीएच' म्हणजेच 'डेव्हलपमेंटल डिस्प्लेजिया ऑफ द हिप' या दुर्मीळ वैद्यकीय स्थितीबद्दल नुकताच एका पॉडकास्टमध्ये खुलासा केला आहे. लारा दीड वर्षांची असताना या आजाराचे निदान झाले.*

पाश्चात्य देशांमध्ये जन्मानंतर लगेचच याचे निदान केले जाते. मात्र भारतात अनेकदा याकडे दुर्लक्ष होते किंवा निदान होण्यास उशीर लागतो. लाराला शस्त्रक्रियेची गरज भासली नसली तरी, अडीच महिने 'स्पायका कास्ट' मध्ये राहावे लागले. सध्या ती यातून सावरत असून, उपचारांना सकारात्मक प्रतिसाद देत आहे. डीडीएच ही अशी स्थिती आहे जिथे बाळाच्या खुब्याचा सांधा पूर्णपणे विकसित झालेला नसतो. हा सांधा एकतर सैल असतो किंवा जागेवरून पूर्णपणे निसटलेला असतो. पालकांना या आजाराचे लवकर निदान न होण्यामागचे मुख्य कारण म्हणजे यामध्ये लहान मुलांना वेदना जाणवत नाहीत. बाळ रडत नसल्यामुळे ही समस्या गंभीर होईपर्यंत लक्षात येत नाही. म्हणूनच याच्या लक्षणांकडे बारीक लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. जर बाळाच्या दोन्ही पायांच्या लांबीमध्ये फरक जाणवत असेल, पाय पसरताना त्रास होत असेल किंवा चालताना बाळ लंगडत असेल, तर हे डीडीएचचे लक्षण असू शकते. या स्थितीचे निदान करण्यासाठी प्रामुख्याने अल्ट्रासाऊंड किंवा क्ष-किरण चाचणीचा आधार घेतला जातो. जनुकीय कारणांशिवाय, गर्भात उलटे असलेल्या बाळांना (ब्रीच पोझिशन), कुटुंबात पूर्वइतिहास असलेल्या मुलांना किंवा पहिल्या अपत्याला या आजाराचा धोका अधिक असतो. संशोधनानुसार, मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये हे प्रमाण अधिक आढळते. वेळीच निदान झाल्यास मुलांचे भविष्य सुखकर होऊ शकते, अन्यथा भविष्यात त्यांना गंभीर संधिवात किंवा 'स्लिप डिस्क' सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.



डीडीएचवरील उपचार हे बाळाचे वय आणि आजाराच्या तीव्रतेवर अवलंबून असतात. उपचारांचे प्रामुख्याने तीन प्रकार आहेत; पहिला म्हणजे 'ब्रेस' लावणे, जे सांध्याला योग्य जागी स्थिर ठेवण्यास मदत करते. दुसरा प्रकार म्हणजे कंबर ते पायापर्यंत प्लास्टर लावणे, जेणेकरून सांधा हलणार नाही. जर परिस्थिती अधिक गंभीर असेल, तर शस्त्रक्रियेचा पर्याय निवडला जातो. मुलांच्या हाडांची वाढ योग्य रीतीने होण्यासाठी जन्मानंतर त्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करणे हाच यावरील सर्वात प्रभावी उपाय आहे. वरुणाने आपल्या अनुभवातून पालकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. 'डीडीएच'या स्थितीमध्ये खुब्याचा सांधा आपल्या मूळ जागेवरून सरकतो, ज्यामुळे मुलाला चालणे किंवा धावणे कठीण होऊन बसते.




## वेदनादायक फंगल नेल इन्फेक्शन

मानवी शरीरातील नखांना बुरशीचा संसर्ग होणे ही एक सामान्य पण त्रासदायक समस्या असून, वैद्यकीय परिभाषेत याला 'फंगल नेल इन्फेक्शन' किंवा 'टो-नेल फंगस' असे म्हटले जाते. प्रामुख्याने पायांच्या नखांमध्ये उद्भवणारा हा संसर्ग हळूहळू हातांच्या नखांपर्यंतही पोहोचू शकतो.

ओले किंवा घामाने भिजलेले बूट सतत वापरणे, दीर्घकाळ नखे ओली ठेवणे आणि सार्वजनिक ठिकाणी जसे की जिम किंवा जलतरण तलावांच्या परिसरात अनवाणी चालणे, ही या संसर्गाची मुख्य कारणे आहेत. स्वच्छतेचा अभाव आणि नखांना झालेली किरकोळ इजादेखील बुरशी वाढण्यास पोषक ठरते.

संसर्ग प्राथमिक स्वरूपाचा असल्यास घरगुती उपाय फायदेशीर ठरू शकतात. यामध्ये 'टी-ट्री ऑईल'चा वापर दिवसातून दोनदा केल्यास संसर्ग रोखण्यास मदत होते. तसेच खोबरेल तेलातील बुरशीविरोधी (अँटीफंगल) गुणधर्म नखांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पाय दीर्घकाळ पाण्यात भिजवून ठेवणे टाळावे आणि बूट घालण्यापूर्वी पायांना पावडर लावणे फायदेशीर ठरते. नखांची निगा राखताना ती कोरडी ठेवणे हा यावरील सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे.

हा संसर्ग जुना झाला असेल, तर केवळ घरगुती उपायांवर अवलंबून न राहता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अनिवार्य आहे.


सध्या वैद्यकीय क्षेत्रात 'लेझर तंत्रज्ञान' उपलब्ध असून, याद्वारे १०६४ नॅनोमीटर एनडी: वायएजी लेझर किरणांचा वापर करून बुरशीच्या पेशी मुळापासून नष्ट केल्या जातात. हे तंत्रज्ञान आसपासच्या त्वचेला इजा न पोहोचवता केवळ बाधित भागावर उपचार करते, ज्यामुळे संसर्ग पुन्हा उद्भवण्याची शक्यता कमी होते.

नखांमधील बदलांकडे दुर्लक्ष न करता वेळीच उपचार घेतल्यास नखांचे सौंदर्य आणि आरोग्य दोन्ही टिकवता येते.



या संसर्गाचा सर्वाधिक धोका मधुमेही रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि ज्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी आहे अशा व्यक्तींना अधिक असतो. नखांचा रंग बदलून तो पिवळसर, करडा किंवा पांढरा होणे, नखांवर डाग पडणे, नखे जाड आणि कडक होणे ही या आजाराची प्राथमिक लक्षणे आहेत. संसर्ग बळावल्यास नखे ठिसूळ होऊन तुटू लागतात.

# नवाकाळ शब्दकोडे-१५८१



**आडवे शब्द -**

२. वखवखलेला, अधाशी ५. चारपैकी एक वेद ७. उदर ८. अर्पण करणे १०. संकट ११. दळलेली साखर १२. शुभ्र रंगाचा, सफेद १४. बेघर १५. पाणी वाहून नेण्याचे तराजूसारखे साधन १७. काळी मिरी (सं.) १८. नृत्य-गायनाला साथ देणारा वादक २१. पृथ्वी २४. अंगवळणी पडलेली कृती २६. बारा वर्षांचा काळ २९. लग्नाचा हंगाम ३०. अस्तनी ३३. छाननी करणारा ३७. मायेचा उमाळा, आवेग ३८. अन्य उपाय किंवा मार्ग (नसणे) ४०. युद्धात प्रेरणा देणारे गाणे ४२. दुःख, वेदना ४३. रोटीचे सोनेरी धान्य ४५. कलिका ४६. राष्ट्र ४८. प्रखर, जहाल ५०. खिसेकापू ५४. ओशाळलेला ५५. धन, वित्त ५६. गोष्ट ५७. वैयक्तिक सुरक्षा सांभाळणारा ५९. अमावस्या ६०. मजबूत ६२. हात ६३. जलदगती ६५. त्वचेची संवेदना ६७. डास चावल्यावर येणारा ज्वर ७०. भीती ७१. गर्व ७३. चहाचा पेला ७५. इमारतीभोवतीची मोकळी जागा ७६. औषध ७९. चांदी ८१. नदीचा काठ ८२. नवलाई ८४. पंचविसावा वर्धापनदिन ८७. लाकूड घासण्याचे हत्यार ९०. जंगल ९२. पूर्वजांनी दिलेले ९४. घरंदाज ९६. बैठक ९७. बारीक फोड १००. कुत्रा १०१. लोकरीचे जाडेभरडे वस्त्र १०२. धनुष्याच्या दोरीचा आवाज १०३. कापणे, छाटून टाकणे १०४. सज्ज १०५. शीण

**उभे शब्द -**

१. सुवासिक २. शक्तिहीन, उपाय खुंटलेला ३. पलीकडे, कट्टा ४. कारकून ५. निवृत्तीचे वय ६. मालीश ७. मायेचे छत्र हरपलेला ८. वृद्धी ९. अवैध, अयोग्य ११. पूर्वज १२. कौरवांचे पाच चुलतभाऊ १३. 'तोच चंद्रमा नभात, तीच चैत्र यामिनी, एकांती मजसमीप ×× ×× ×××' सुधीर फडके यांच्या आवाजातील शांता शेळके यांनी लिहिलेले भावगीत १६. केळ्यांसाठी प्रसिद्ध मुंबईजवळचा तालुका १९. बगळा २०. सरशी २२. निष्पाप २३. कृष्णाचे वाद्य २५. सफलता २७. अब्रू २८. सत्त्व ३०. मूल ३१. पूर्वी भारताचाच भाग असलेला पूर्व सीमेवरील देश ३२. धोका ३४. डोंगराचा तळाजवळचा भाग ३५. कंटाळवाणे, रूक्ष ३६. दूर्वा ३७. श्रीकृष्ण लहान असताना त्याच्या खुनाचा प्रयत्न करणारी राक्षसी ३९. स्त्रीच्या नाकातला अगदी बारीक दागिना ४१. दहावी रास ४२. कामात गढलेला ४४. हात राखून केलेला खर्च ४७. तीर, बाण ४८. खिन्नता, अलिप्तता ४९. ओळ, रांग ५०. काचेचा आरपार दिसण्याचा गुण ५१. शिखर, मस्तक ५२. जग जिंकणारा, सिकंदर ५३. खाणारा ५५. नेमस्त ५८. कर्म, कृत्य ६१. रूढी, चाकोरी ६३. खुळचट, मंदमती ६४. फळातील खाद्यभाग ६८. नवरदेव ६९. फूटपाथ ७२. सागराच्या लाटांचा आवाज ७४. भवताल ७५. जठराखालचा अवयव ७७. घोडा ७८. अधोगती ७९. मदनाची पत्नी ८०. पोळी, भाकरी भाजण्याचा पत्रा ८३. पदाची जबाबदारी ८५. सलगी ८६. या हंगामात ८८. सैनिकांचा सामूहिक व्यायाम ८९. लकब, पद्धत ९१. उपवास सोडणे ९३. पुरावा किंवा आधार असलेले ९४. हुलगे ९५. नखरेल ९६. मानसन्मान ९८. प्रीती १००. तात्पर्य •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५८० चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. उपासमार ६. अंगकाठी ९. मोहक १२. रमणीय १४. नवागत १६. अनुजा १८. व्याधी १९. बीज २०. मल्ल २१. कळस २३. मागमूस २५. सल २६. अनुरोध २८. वंदन ३१. फटकळ ३२. प्रसंग ३४. जामानिमा ३५. द्रव्यहीन ३८. कसा ४०. शेज ४१. दीप ४२. नकुल सहदेव ४७. प्रादेशिक ४९. अस्थिर ५०. क्षमा ५३. जात ५४. उपासना ५७. आलमगीर ६०. गीता ६२. चतुराई ६५. यश ६६. साठी ६७. शल्यकर्म ६९. डर ७१. धाक ७३. कुंतल ७४. आलिंगन ७५. अनल ७७. बातमीदार ८०. बूड ८१. तीन ८२. तथापि ८४. भेजा ८५. नाकपुडी ८७. वक्र ८८. करभ ९०. चाक ९१. सनदशीर ९५. टपाल ९७. धडा शिकवणे ९९. तथाकथित १०१. आकंठ १०२. शव १०३. कासव १०५. पळ १०६. जिवती १०७. अंमलदार १०८. धूम्रपान १०९. तयारी

**उभे शब्द :** १. अरबी समुद्र २. उणी ३. पायमल्ली ४. मान ५. रवा ६. अंत ७. कावीळ ८. हनुमान १०. हव्यास ११. कधी १३. मजल १५. गदारोळ १७. जाग २२. सवंग २४. मूठमाती देणे २६. अटक २७. नुकसान २९. दमा ३०. ग्वाही ३३. संदेह ३६. व्यवस्थित ३७. नदी ३९. शील ४०. शेव ४२. पक्षपात ४४. कुडी ४५. सध्या ४६. देवालय ४८. कळता ४९. अजातशत्रू ५१. मास ५२. सुगी ५५. नाच ५६. दोरा ५८. मशक ५९. रसायन ६१. नेकजात ६३. तुच्छ ६४. ईडलिंबू ६८. खतरनाक ७०. रगड ७२. कदापि ७३. कुंदा ७५. अनवरत ७६. लत ७७. बाजार ७८. मीठ ७९. शिपुरडा ८३. थारा ८४. भेकड ८६. शेंदणे ८९. भटकंती ९०. चाल ९१. सकस ९२. नववधू ९३. नकळत ९४. शेतकरी ९६. पाठ ९७. धवल ९८. शिकार १००. थाप १०१. आव १०२. शम १०४. खोपा

# रायगडातील पेण ग्रोथ सेंटरसाठी २१६ एकर जमीन यशस्वीरित्या संपादित

■ मुंबई

मुंबई ३.० या महत्त्वाकांक्षी नव्या शहर संकल्पनेतून एमएमआरडीएने रायगड जिल्ह्यातील नव्या ग्रोथ सेंटरसाठी २१६ एकर हेक्टर जमीन भूधारकांच्या संमतीने यशस्वीरित्या संपादित केली. एमएमआरडीएच्या लोककेंद्रित व पारदर्शक सहभागात्मक भूसंपादन धोरणाला मिळालेल्या प्रतिसादामुळे धोरण जाहीर झाल्याच्या पहिल्याच दिवशी महत्त्वपूर्ण प्रगती साध्य झाली.

मुंबई ३.० अंतर्गत नवीन शहर विकास क्षेत्रातील प्रस्तावित रायगड-पेण विकास केंद्रासाठी भूधारकांनी मोठ्या प्रमाणावर



संमती दर्शविल्याचे या घडामोडीतून स्पष्ट होते. या करारामुळे या प्रकल्पाला अधिक बळ मिळाले. हा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र.से. यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. त्यामुळे जागतिक दर्जाच्या एकात्मिक शहरी विकास प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस औपचारिक प्रारंभ झाला.

## रायगडातील कुंडलिका खाडीवरील पुलाचे बांधकाम अखेर सुरू

■ रायगड

**रेवस-रेड्डी** सागरी महामार्ग प्रकल्पातील महत्त्वाच्या कुंडलिका खाडीवरील पुलाचे काम वेगाने सुरू झाले आहे. सुमारे ३.८ किलोमीटर लांबीच्या या पुलासाठी अलिबाग तालुक्यातील रेवदंडा बाजूकडून खांब उभारण्यास सुरुवात झाली आहे.

हा पूल पूर्ण झाल्यानंतर रेवदंडा ते साळाव या भागांना थेट जोडणी मिळणार आहे. सध्याच्या जुन्या पुलावरील ताण कमी होईल. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाला गेल्या वर्षी भूमिपूजनानंतर गती मिळाली आहे. सध्या आधुनिक यंत्रसामग्रीसह मोठ्या प्रमाणावर काम

## इटलीत गुरुद्वारातून बाहेर पडताना दोन भारतीयांची गोळ्या झाडून हत्या

■ रोम

**हल्लेखोर कारने फरार**

**इटलीतील** बर्गामो प्रांतातील कोवो येथे दोन भारतीय व्यक्तींची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. गुरुद्वारात वैसाखी सणानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर ते दोघे बाहेर पडत असताना हल्ला झाला. मृतांची ओळख पटली असून, रगिंदर सिंग आणि गुरमीत सिंग अशी त्यांची नावे आहेत. हल्लेखोर गोळ्या झाडल्यानंतर कारने घटनास्थळावरून पळून गेले. हा हल्ला रात्री औद्योगिक भागात असलेल्या 'गुरुद्वारा माता साहिब कौर जी'जवळ झाला. प्राथमिक तपासात ही घटना नियोजनबद्ध हल्ला असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. घटनास्थळावरून सुमारे १० गोळ्यांच्या पुंगळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. एका प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने सांगितले की, हल्लेखोरही भारतीय होता आणि तोदेखील त्या गुरुद्वारात येत असे. या गोळीबारात एका तिसऱ्या व्यक्तीलाही किरकोळ दुखापत झाली.

## इराणने होर्मुजवरील निर्बंध आता आणखी कठोर केले

पान १ वरून

काल इराणने भारताच्या दोन जहाजांवर हल्ला केला होता. आजही इराणने भारताची १४ जहाजे अडवली. इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघर गालिबाफ म्हणाले की, अमेरिकेने इराणी बंदरांवर लावलेली नाकाबंदी चुकीचा आणि बेजबाबदार निर्णय आहे. हे पाऊल प्रदेशात तणाव वाढवत आहे.

होर्मुजमध्ये माइन-क्लिअरिंगसारख्या कोणत्याही कारवाईला युद्धविरामाचे उल्लंघन मानले जाईल. त्याला प्रत्युत्तर दिले जाईल. इराण चर्चेसाठी तयार आहे, परंतु याला इराणची कमजोरी समजू नये. होर्मुज कधी खुले करायचे, हे केवळ इराणचे सर्वोच्च नेते ठरवतील. इतर कुणी बाहेरील शक्ती ठरवू शकत नाही. दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यात उद्यापासून पाकिस्तानात चर्चेची दुसरी फेरी होणार आहे. यापूर्वी चर्चेची पहिली फेरी फिस्कटली होती. आता दुसऱ्या फेरीपूर्वी अमेरिका आणि इराण दोन्हीही देश आपल्या ताठर भूमिकेवर ठाम असल्याने ही दुसरी फेरी तरी यशस्वी होईल का, याबाबत शंका आहे.

## सरावादरम्यान हवेची दिशा बदलली विद्यार्थ्याच्या गळ्यातून भाला आरपार

■ डेहराडून

**उत्तराखंडच्या** चंपावत येथे नुकतीच एक हृदयद्रावक घटना घडली. येथे पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये शिकत असलेला एक विद्यार्थी मैदानावर भालाफेकीचा सराव करत असता अचानक वाऱ्याची दिशा बदलली आणि त्याने फेकलेला भाला भरकटून मैदानावरील एका विद्यार्थ्याच्या गळ्यातून आरपार गेला. या घटनेत त्या विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. रुग्णालयात त्याला पाहायला गेलेली त्याची आई त्याचे कलेवर पाहून भोवळ येऊन पडली.

शनिवारी कॉलेजच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेची तयारी सुरू होती. या स्पर्धेसाठी विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांसाठी तयारी करत होते. सरावादरम्यान एका विद्यार्थ्याने भाला हवेत फेकला. मात्र त्याचवेळी वाऱ्याची दिशा अचानक बदलली आणि भाला समोरच्या दिशेने न जाता भलतीकडेच वळला आणि मैदानावर फुटबॉलचा सराव करणाऱ्या अन्य एका विद्यार्थ्याच्या गळ्यातून आरपार गेला. सोमेंद्र सिंह बोहरा असे या विद्यार्थ्याचे नाव आहे.



भायखळा येथील श्री साईबाबा मंदिरात अक्षय तृतीयेला आंब्यांची आरास करण्यात आली. (छाया: दीपक साळवी)

## उधना रेल्वे स्थानकावर प्रचंड गर्दी लाठीमारामुळे चेंगराचेंगरीची स्थिती

■ सुरत

**आखाती** युद्ध आणि एलपीजी संकटाचा परिणाम आता भारतातही जाणवू लागला असून, त्याचा फटका मजूरवर्गाला बसत आहे. अनेक ठिकाणी उद्योगधंदे ठप्प होत असल्याने मजुरांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर सुरू झाले आहे. याच पार्श्वभूमीवर सुरतमधील उधना रेल्वे स्थानकावर आज प्रवाशांची मोठी गर्दी उसळल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. उत्तर प्रदेश आणि बिहारकडे जाणाऱ्या गाड्यांसाठी हजारो प्रवासी स्टेशनवर जमा झाले होते. सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास उधना-हसनपूर गाडीकरिता प्रवाशांना रांगेत उभे करण्यात येत असताना काहींनी रांग तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परिस्थिती बिघडू लागल्याने पोलीस व आरपीएफ जवानांनी लाठीमार केला.

यामुळे काही काळ चेंगराचेंगरीसारखी स्थिती निर्माण झाली. उधना रेल्वे स्थानक परिसरात झालेल्या या गोंधळाचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. यात प्रवासी पोलिसांच्या लाठीपासून बचाव करण्यासाठी धावाधाव करताना दिसत आहेत. रेल्वे अधिकारी अनुभव सक्सेना यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारपर्यंत सहा गाड्यांद्वारे सुमारे २१ हजारांहून अधिक प्रवाशांना रवाना करण्यात आले. तरीही गर्दी एवढी प्रचंड होती की व्यवस्थापन करणे कठीण झाले. प्रवाशांना शिस्त पाळण्याचे वारंवार आवाहन करण्यात आले, मात्र अव्यवस्था वाढल्याने पोलिसांना कठोर कारवाई करावी लागली.

## काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी विशेष एसआयआर प्रशिक्षण कार्यक्रम

■ मुंबई

**महाराष्ट्रात** सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनरिक्षण एसआयआर प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर मुंबई युवक काँग्रेसच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली गांधी भवन, कुलाबा येथे हा कार्यक्रम पार पडला.

या प्रशिक्षण सत्रासाठी मुख्य प्रशिक्षक म्हणून मुंबई काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे पदाधिकारी असद उस्मानी उपस्थित होते. त्यांनी एसआयआर प्रक्रियेची सविस्तर माहिती देत, मतदार यादी पुनरिक्षणातील तांत्रिक बाबी, अर्ज प्रक्रिया, आक्षेप नोंदविण्याच्या पद्धती तसेच पात्र मतदारांची नावे वगळली जाणार नाहीत यासाठी आवश्यक खबरदारी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना झीनत शबरीन म्हणाल्या की, निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात सुरू केलेल्या एसआयआर मोहिमेच्या आधी ज्या राज्यांमध्ये ही प्रक्रिया राबविण्यात आली त्या ठिकाणी लाखो मतदारांची नावे वगळली गेल्याची उदाहरणे समोर आली आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणत्याही पात्र मतदाराचे नाव चुकीच्या पद्धतीने वगळले जाऊ नये, यासाठी युवक काँग्रेसने हे प्रशिक्षण आयोजित केले आहे. या माध्यमातून कार्यकर्त्यांना सुसज्ज करून प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्याचा आमचा निर्धार आहे.

## साखरयुक्त पेय ओआरएस म्हणून विकणाऱ्या कंपनीविरुद्ध लढणाऱ्या डॉक्टरचा राजीनामा

पान १ वरून

होते. ओआरएस लेबल लावण्यावर बंदी घालण्यात आल्यानंतरही कंपनीने चालाखी करत त्याच पेयाचे नाव बदलून इआरझेडएल या नवीन नावाने पेय बाजारात आणली. डॉ. शिवरंजनी संतोष यांनी त्याला विरोध केला. या नावामुळे आपल्या पाल्याच्या अतिसार किंवा डिहायड्रेशनच्या तक्रारीवर उपचार घेणाऱ्या पालकांची दिशाभूल केली जाऊ शकते, असा आक्षेप डॉ. शिवरंजनी यांनी घेतला. अन्य बाल रोगतज्ज्ञांनीदेखील आयएपीकडे तक्रारी करून अशा प्रकारे दिशाभूल करणाऱ्या कंपन्यांना पायबंद घालण्यासाठी ठोस कृती करण्याची मागणी केली. त्यानंतर आयएपीने, केवळ व्यावसायिक एनर्जी पेये ओआरएसची जागा घेऊ शकत नाहीत, असे सांगत अशा प्रकारची पेये घेताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. आयएपीच्या या उदासीन प्रतिसादामुळे निराश झालेल्या डॉ. शिवरंजनी यांनी संस्थेतील सदस्यत्वाचा राजीनामा दिला. डॉ. शिवरंजनी यांच्या राजीनाम्याबद्दल विचारले असता संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नीलम मोहन यांनी सांगितले की, संस्था पूर्णपणे वैज्ञानिक आधारांवर चालते. जर एखाद्या व्यक्तीला संस्थेची धोरणे मान्य नसतील आणि त्यामुळे जर कोणी राजीनामा देत असेल तर तो त्या व्यक्तीचा वैयक्तिक निर्णय आहे.

## अजित पवारांच्या अपघाताची चौकशी

पान १ वरून

विमानात बसण्याची भीती बोलून दाखवली. परंतु सरकारमधील काही लोकांचा वरदहस्त असल्याने 'सरकार आपल्या पाठीशी आहे, घाबरू नका' असा शाब्दिक धीर त्यांना देण्यात आला. पण दुर्दैवाने अपघात झाला तर व्यवस्थापनाने त्यांना दिलेल्या या शाब्दिक धीराने त्यांचा जीव वाचणार आहे का? एकीकडे अजितदादांच्या अपघातानंतर महाराष्ट्र सरकारने व्हीएसआर कंपनीची ८० कोटींची बिले अदा केली. दुसरीकडे कंपनीवर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही.

## खरातला पाचव्या गुन्ह्यात ५ दिवसांची पोलीस कोठडी

पान १ वरून

डोकेदुखीचा त्रास होत असल्याचे त्यांनी सांगितले. पेनकिलर घेत असूनही आराम मिळत नसल्याने न्यूरोसर्जनकडून तपासणीची परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. यावर न्यायालयाने पोलिसांना वैद्यकीय तपासणीदरम्यान न्यूरोसर्जनकडे तपासणी करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, खरातने आपल्या मोबाईलमधील अनेक फोटो, चॅट, व्हिडिओ आणि संपर्क क्रमांक डिलिट केले होते. मात्र, फॉरेन्सिक तपासाच्या मदतीने हा संपूर्ण डाटा पोलिसांनी पुन्हा मिळवला आहे. या डाटामधून अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता असून, खरात कोणाच्या संपर्कात होता. तसेच त्याचे आर्थिक व्यवहार आणि संभाव्य नेटवर्क याबाबत महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे.

## बंगालच्या बहिणींना सवलती मोदींकडून योजनांचा पाऊस

■ पुरुलिया

**पश्चिम** बंगालच्या पुरुलिया येथे जनसभेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तृणमूल काँग्रेसवर कडाडून टीका केली. काल महिला विधेयक मंजूर न झाल्याने धक्का बसलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगालच्या लाडक्या बहिणींवर सवलतीचा पाऊस पाडला. 'लखपती दीदी' गर्भावस्थेदरम्यान बहिणींना १,०००, वीजबिलातून बहिणींना मुक्ती, सवलतीत औषधे अशा आकर्षक योजना त्यांनी जाहीर केल्या. तृणमूलचे जंगलराज हटवून भाजपाचे सरकार स्थापन करण्याचे आवाहन केले. डबल इंजिन सरकार असेल तर कसे फायदे होतील ते सांगितले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, तृणमूल आज बंगालच्या मुलींमध्ये भीती निर्माण करत आहे. एखादी मुलगी डॉक्टर व्हायचे स्वप्न पाहते, वकील व्हायचे, शिक्षिका व्हायचे स्वप्न पाहते, पण तृणमूलचे हे निर्दयी सरकार त्यांच्या स्वप्नांवर पाय देत आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये बलात्कार, अत्याचार, खून यांसारख्या घटना घडत आहेत आणि ममता सरकार दोषींनाच संरक्षण देत आहे. संपूर्ण देशाला संसद आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण हवे होते. यावर संसदेत चर्चा झाली. पण तृणमूलला हे नको होते. कारण जास्त महिला निवडून आल्या तर त्या महिला हक्कांसाठी आवाज उठवतील.

## लग्न लपवले! रिसॉर्टवर अत्याचार

पान १ वरून

आहे. त्यानंतर पीडितेने आरोपीला जाब विचारला असता त्याने तिच्याशी लग्न करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे स्पष्ट केले. आरोपी आणि त्याचे दोन सहकारी कंपनीच्या उपहारगृहात वारंवार भेटून देवदेवतांबाबत अवमानकारक वक्तव्य करत होते. आरोपीसह इतरांनी मिळून लैंगिक शोषण केल्याचा आणि ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाची ३ सदस्यीय समिती नाशिक येथे काल दाखल झाली आहे. या समितीत साधना जाधव, बी. के. सिन्हा, मोनिका अरोरा आणि लीलाबती यांचा समावेश आहे. पहिल्याच दिवशी समितीने एका पीडित महिलेसह तिच्या कुटुंबियांशी डिजिटल माध्यमातून संवाद साधला. ही समिती २० एप्रिलपर्यंत नाशिकमध्ये थांबून संबंधितांशी प्रत्यक्ष संवाद साधणार असल्याची माहिती आहे.







नवाकाळ

• मुंबई । सोमवार २० एप्रिल, २०२६ • पान -८

## श्रीमंत दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांची आरास



**पुणे-** साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अक्षय्य तृतीयेनिमित्त श्रीमंत दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांची आरास करण्यात आली होती. पुण्यातील प्रसिद्ध आंबा व्यापारी देसाई आंबेवालेचे संचालक मंदार देसाई आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हस्ते हा महाभोग अर्पण करण्यात आला. या आंब्यांचा प्रसाद ससून रुग्णालय येथील रुग्ण, श्रीवत्समधील मुले, वृद्धाश्रम तसेच दिव्यांग संस्थांमध्ये वाटण्यात येणार असून, मंदिरात आलेल्या भाविकांनाही हा प्रसाद वितरित केला जाणार आहे.

**१५ एप्रिल २०२६ -** मुंबई हायकोर्टाने एका निर्णयात स्पष्ट केले आहे की, कार्यालयात महिला सहकाऱ्याच्या शरीराकडे किंवा छातीकडे पाहणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचे आणि असभ्य वर्तन आहे. परंतु भारतीय दंड संहिता (IPC) च्या कलम 354C अंतर्गत 'ताक-झांक' (voyeurism) या अपराधिक गुन्ह्यात त्याची गणना होत नाही.



ऑफिसमध्ये महिला सहकाऱ्याच्या स्तनांकडे पाहणे 'ताक-झांक' (Voyeurism) गुन्हा नाही, असा निर्णय नुकताच मुंबई हायकोर्टाने दिला. त्याबद्दल...

# मनाला न पटणारे अनेक जजमेंट्स समोर येतात वाचायची इच्छा नसते, पण वाचणं भाग पडतं

न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने २०१५ मध्ये नोंदवलेली FIR रद्द करताना नमूद केले की, आरोप इतकाच आहे की आरोपीने मीटिंगदरम्यान महिला सहकाऱ्याच्या छातीकडे पाहिले. अनिच्छितपणे पाहणे, जरी अयोग्य असले तरी, कलम 354C च्या अर्थाने 'ताक-झांक' ठरत नाही. कायद्याचा अर्थ त्याच्या शब्दांच्या पलीकडे वाढवता येत नाही.

**प्रकरण काय होते?**

हे प्रकरण एका खासगी विमा कंपनीशी संबंधित आहे. आरोपी त्या वेळी Assistant Vice President पदावर कार्यरत होता. महिला तक्रारदार (Deputy Sales Manager) यांनी २०१५ मध्ये बोरीवली पोलीस ठाण्यात FIR दाखल केली होती. तक्रारीनुसार, मीटिंगदरम्यान आरोपी डोळ्यांत संपर्क साधण्याऐवजी वारंवार छातीकडे पाहत होता आणि अयोग्य टिप्पणी करत होता.

पोलिसांनी IPC कलम 354C (voyeurism) अंतर्गत गुन्हा नोंदवला होता. आरोपीने हायकोर्टात FIR रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली होती.

**कोर्टाने काय म्हटले?**

न्यायालयाने स्पष्ट केले की IPC कलम 354C तेव्हाच लागू होते जेव्हा एखादी व्यक्ती महिला खासगी कृती करत असताना तिच्याकडे पाहते किंवा तिचे रेकॉर्डिंग करते, जिथे तिला गोपनीयतेची अपेक्षा असते (उदा. बाथरूम, कपडे बदलणे किंवा लैंगिक कृती). ऑफिसमधील मीटिंगमध्ये पाहणे या व्याख्येत बसत नाही.

कोर्टाने पुढे नमूद केले की, असे वर्तन अनैतिक (morally wrong), असभ्य (indecent) आणि Misconduct असू शकते. मात्र, त्याला गुन्हा ठरवण्यासाठी कायद्याचा अतिरेक करणे योग्य नाही.

**-ॲड. अनुनया जैनजांगडे**

FIR आणि त्यासंबंधित सर्व पुढील कार्यवाही रद्द करण्यात आली.

**POSH कायद्यानुसार स्वतंत्र तरतूद-**

कोर्टाने स्पष्ट केले की हा प्रकार voyeurism नसला तरी POSH Act 2013 (Sexual Harassment of Women at Workplace Act) अंतर्गत तो लैंगिक छळ (sexual harassment) मानला जाऊ शकतो. POSH अंतर्गत staring/leering ho "unwelcome non-verbal conduct of sexual nature' मानले जाते, ज्यामुळे कार्यस्थळाचे वातावरण अस्वस्थ किंवा शत्रुत्वपूर्ण (hostile) होऊ शकते.

कंपनीने Internal Complaints Committee (ICC) मार्फत चौकशी करावी आणि दोष सिद्ध झाल्यास शिस्तभंगाची कारवाई (इशारा, निलंबन किंवा बडतर्फी) केली जाऊ शकते.

**तज्ज्ञांची प्रतिक्रिया -**

काही कायदे तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय कायद्याच्या मर्यादा स्पष्ट करतो. एका वकिलाने म्हटले आहे, अनिच्छितपणे पाहणे नक्कीच चुकीचे आहे आणि कार्यस्थळावर ते सहन केले जाऊ नये. परंतु प्रत्येक आक्षेपार्ह वर्तनाला गुन्हा बनवता येत नाही. POSH सारख्या नागरी आणि प्रशासकीय यंत्रणा अधिक प्रभावी ठरतात.

**काय सांगतो कायदा?**

कलम 354C: खासगी कृतीदरम्यान ताक-झांक किंवा रेकॉर्डिंग - १ ते ३ वर्षांपर्यंत शिक्षा

POSH Act: कार्यस्थळावरील लैंगिक छळाची व्यापक व्याख्या, ज्यात staring चा समावेश

इतर IPC कलमे (354A, 509, 354) गंभीर प्रकरणांमध्ये लागू होऊ शकतात. परंतु ते परिस्थिती, पुनरावृत्ती आणि हेतूवर अवलंबून असते.

**कोर्टाचा निष्कर्ष -**

मुंबई हायकोर्टाचा हा निर्णय आपल्याला आठवण करून देतो की नैतिकता आणि कायदा यामध्ये फरक असतो. सन्मानजनक कार्यस्थळ निर्माण करण्याची जबाबदारी केवळ कायद्यावर नसून प्रत्येक कर्मचारी आणि व्यवस्थापनावर आहे. महिलांना अस्वस्थ वाटल्यास ICC किंवा HR कडे तक्रार करण्याचा पूर्ण अधिकार आहे, तर पुरुषांनी व्यावसायिक आणि सन्मानपूर्वक वर्तन राखणे आवश्यक आहे.

## मुंबईत आजपासून १ आठवडा पाच टक्के पाणीकपात सुरू

■ मुंबई

**मुंबईतील** पाणीपुरवठ्यावर तात्पुरता परिणाम होणार असून, उद्या २० ते २७ एप्रिलदरम्यान एक आठवडा ५ टक्के पाणीकपात लागू करण्यात येणार आहे. जलबोगदा क्रमांक १ व २ यांच्या देखभाल व क्लोरिनीकरणाच्या कामामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिकेकडून जलबोगद्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण (क्लोरिनीकरण) करण्यात येणार आहे. या कामादरम्यान पाणीपुरवठ्यात कपात होणार आहे. एल (कुर्ला-पूर्व), एम-पूर्व, एम-पश्चिम, एन, एस, टी तसेच ए, बी, सी, ई, एफ-उत्तर आणि एफ-दक्षिण या विभागांमध्ये या कालावधीत ५ टक्के पाणीकपात लागू राहील. महापालिकेने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले असून, आवश्यक खबरदारी घेण्यास सांगितले आहे.

## मराठी सक्तीला रिक्षा संघटनांचा तीव्र विरोध! आज भूमिका ठरणार

■ मुंबई

**महाराष्ट्रात** रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला रिक्षा संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मेपासून मराठी लिहिता-वाचता न येणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्याचा इशारा दिला आहे. यावरून हा वाद निर्माण झाला आहे. सरकारच्या या निर्णयाविरोधात आंदोलनाची भूमिका काय असेल हे ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेच्या संयुक्त कृती समिती उद्या सोमवार २० एप्रिल रोजी जाहीर करणार आहे.

राज्यातील परवानाधारक रिक्षा-टॅक्सी चालकांना १ मेपासून मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविली जाणार आहे. यात मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्याचा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. त्यामुळे विविध रिक्षा संघटनांनी या निर्णयाला कडाडून विरोध दर्शविला.

## जनगणना कामासाठी राज्यातील शिक्षकांच्या उन्हाळी सुट्ट्या रद्द

**जिल्हा परिषदेच्या बदल्याही स्थगित**

■ मुंबई

**आगामी** मे महिन्यात महाराष्ट्रामध्ये जनगणना होणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शिक्षकांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. सर्व जिल्हा परिषदांच्या बदल्यांनाही स्थगिती देण्यात आली आहे. यामध्ये गट 'क' आणि 'ड' कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा समावेश आहे, अशी माहिती ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहे.

मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, शासनाच्या निर्देशानुसार, जनगणना अधिनियम १९४८ व जनगणना नियम १९९० अंतर्गत येणाऱ्या वैधानिक जबाबदाऱ्या सुरळीत आणि प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदेमधील गट 'क' व गट 'ड' संवर्गातील जनगणनेच्या कामाशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांच्या (शिक्षकांसह) २०२६ मधील सर्वसाधारण बदली प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे जनगणना करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ स्थिर राहून माहिती संकलन, नोंदणी आणि पडताळणी प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक, वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे. शाळांचा निकाल १ मे रोजी जाहीर होणार असून २ मेपासून शाळांना सुट्टी लागेल. मात्र २ मे ते १४ जून या कालावधीत उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये शिक्षकांना विश्रांती मिळणार नाही. मात्र १६ मे ते १४ जून या कालावधीत शिक्षकांना जनगणनेअंतर्गत विविध याद्या तयार करण्याचे काम देण्यात आले आहे. या कामासाठी जिल्हा परिषदेच्या सुमारे साडेपाच हजार शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## क्रॉफर्ड मार्केट येथील उम्रीगर इमारतीला आग

■ मुंबई

**क्रॉफर्ड** मार्केट परिसरातील उम्रीगर इमारतीत आज सकाळी अचानक आग लागली. ही आग इमारतीच्या तळमजल्यावरील काही दुकानांमध्ये पसरल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी जाऊन आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही दुकानांचे नुकसान झाले.

## मोदींच्या नसानसांत काँग्रेस! खा. संजय राऊतांचा टोला

■ मुंबई



**पंतप्रधान** मोदींनी काल भाषणात ८६ वेळा काँग्रेसचे नाव घेतले. काँग्रेसमुक्त भारत करायला निघालेल्यांच्या डोक्यातून १२ वर्षांत काँग्रेस गेलेली नाही. त्यांच्या नसानसात, रक्ताच्या प्रत्येक थेंबात, प्रत्येक श्वासात, शब्दा-शब्दात आणि विचारांमध्ये काँग्रेस आहे. काँग्रेस शिवाय या देशाला कुणी नेतृत्व देऊ शकत नाही, हे मोदी नकळत सांगत आहेत, असा टोला उबाठाचे खासदार संजय राऊतांनी लगावला.

राऊत पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी काय बोलतात याकडे देश आता गांभीर्याने पाहत नाही. निवडणूक काळात आचारसंहितेचा भंग होईल असे वर्तन ते वारंवार करतात आणि नियमांचे पालन न करण्याची भूमिका घेतात. कायदा माझे काय वाकडे करणार अशा भूमिकेत ते वावरतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खोटे बोलण्याचा राष्ट्रीय आजार जडलेला आहे.

लोकसभेत महिला आरक्षण विधेयक रोखण्याबद्दल राऊत म्हणाले की, भाजपाला लोकसभेच्या ८५० जागा करायच्या होत्या आणि त्या आम्ही रोखल्या. यात महिला आरक्षणाचा काडीमात्र संबंध नाही. २०२३ ला ५४३ जागांसाठी महिला आरक्षणाचे विधेयक सर्वानुमते मंजूर झाले होते. त्यानुसार ५४३ जागांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यायला आमची काहीच हरकत नाही. पण यात महिलांना जागा दिल्या तर कदाचित भाजपाच्या थोर पुरुष मंडळींच्या जागा महिलांसाठी राखीव होतील. अमित शहा आणि मोदींची वाराणसीची जागाही राखीव होऊ शकते.

## इराण युद्धातील मृत सोलंकीवर डीएनए चाचणीनंतर अंत्यसंस्कार

■ मुंबई

**इराण** युद्धात मृत्युमुखी पडलेला ३२ वर्षीय भारतीय खलाशी दीक्षित सोलंकीवर डीएनए चाचणीनंतर काल दुपारी मुंबईतील धनुकरवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. १ मार्च रोजी ओमान किनाऱ्याजवळ मार्शल आयलंड्सचा ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्यात सोलंकी यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूनंतर ४८ दिवसांनी अंत्यसंस्कार पार पडले.

दिक्षित सोलंकी यांचे पार्थिव १ एप्रिल रोजी पहाटे कार्गो विमानाने मुंबईत आणण्यात आले. दीक्षितच्या कुटुंबीयांनी मृतदेहाची डीएनए चाचणी केल्याशिवाय अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला होता. यासाठी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही केली होती. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने डीनएनए चाचणी करून मृतदेहाची ओळख पटवण्याचे आदेश दिले होते.

न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रक्रिया पार पडल्यानंतर दीक्षितच्या मृतदेहाची ओळख पटली. त्याचे वडील अमृतलाल यांनी म्हटले की, काल दुपारी १ वाजता जवळचे नातेवाईक, कुटुंबीय आणि शेजाऱ्यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार केले. आम्ही अजूनही या दु:खातून सावरत आहोत. विधी पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या मुलाने ज्या व्ही शिप कंपनीत काम केले, त्यांच्याशी संपर्क साधणार आहे.

## महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांसह क्रीडामंत्र्यांची शिष्टमंडळ भेट घेणार

■ मुंबई

**महाराष्ट्र** बॉक्सिंग असोसिएशनच्या अडचणी आणि समस्या सोडविण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि क्रीडामंत्री यांची शिष्टमंडळ भेट घेणार असल्याचा निर्णय एकमताने असोसिएशनच्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी दिली.



सर्वसाधारण सभेत निर्णय

सभेला आजीव अध्यक्ष जय कवळी, महासचिव भारतकुमार व्हावळ, कोषाध्यक्ष मनोज पिंगळे, उपाध्यक्ष पंकज भारसाकळे, मुन्ना कुरणे, मिलिंद साळुंखे, तुषार रंधे, अविनाश बागवे, संग्राम गावंडे, ॲड. गौतम चाबुकस्वार, गौरव चांडक, राजेश देसाई, ॲड. शेख अकबर, वैभव वनकर, संतोष आंबेकर, विक्रांत खेडकर, नील पाटील, कॅप्टन शाहूराज बिराजदार, विजय सोनवणे, कार्यकारी सचिव शैलेश ठाकूर, प्रशासकीय सचिव महेश सकपाळ, विभागीय सचिव मयूर बोरसे, मंगेश कराळे, ॲड. संपत साळुंके, अरुण भोसले, विजयकुमार यादव, विजय गोटे उपस्थित होते. या सभेनंतर प्रविण दरेकर म्हणाले की, महाराष्ट्रातील बॉक्सिंगच्या प्रगतीच्या दृष्टीने अनेक योजना असोसिएशनने करण्याचे ठरवले. बॉक्सिंग खेळाडू आणि प्रशिक्षकच्या संदर्भात, विद्यार्थ्यांकडून कमी फी घेण्यासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय या सभेत झाले. असोसिएशनच्या अनेक अडचणी व समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि क्रीडामंत्र्यांना शिष्टमंडळ भेटण्याचे बैठकीत ठरले आहे. ८ विभागांत विभागीय मोठ्या रकमेच्या चांगल्या स्पर्धा घेण्याचे ठरले. अखेरीस राज्यस्तरीय एक मोठी स्पर्धा असोसिएशन घेईल, अशा प्रकारचेही निर्णय झाले आहे.

## बीजिंगमध्ये रोबोटची झेप धावपटूंनाही मागे टाकले



**चीनमध्ये तयार केलेल्या ह्युमनॉईड रोबोटनी धावण्याच्या अर्ध-मॅरेथॉन शर्यतीत भाग घेत मोठी कामगिरी केली. काही रोबोटनी मानवी धावपटूंनाही मागे टाकत आपली वाढती क्षमता दाखवली. या स्पर्धेमुळे रोबोटिक्स क्षेत्रात वेगाने प्रगती होत असल्याचे स्पष्ट झाले.**

■ बीजिंग

**गेल्या** वर्षीच्या पहिल्या स्पर्धेत अनेक अडचणी आल्या होत्या आणि बहुतांश रोबोट शर्यत पूर्ण करू शकले नव्हते. त्यावेळी विजेत्या रोबोटला २ तास ४० मिनिटे लागली होती. हा वेळ मानवी विजेत्याच्या वेळेपेक्षा खूप जास्त होता. मात्र यावर्षी परिस्थिती पूर्ण बदलली. अनेक आघाडीचे रोबोट व्यावसायिक धावपटूंपेक्षाही वेगवान ठरले आणि त्यांनी मानवी विजेत्यांपेक्षा १० मिनिटांहून कमी वेळ घेतला. यावर्षी सुमारे निम्म्या रोबोटनी २१ किमीच्या शर्यतीत रिमोट कंट्रोलऐवजी स्वतःच्या प्रणालीवर अवलंबून राहून कठीण मार्ग पार केला. धडक टाळण्यासाठी रोबोट आणि सुमारे १२,००० पुरुष व महिला धावपटूंसाठी स्वतंत्र ट्रॅक ठेवण्यात आला होता.

चिनी स्मार्टफोन ब्रँड 'ऑनर'ने विकसित केलेल्या विजेत्या रोबोटने ५० मिनिटे २६ सेकंदात शर्यत पूर्ण केली. तो गेल्या महिन्यात लिस्बनमध्ये युगांडाच्या धावपटू जेकब किप्लिमोने केलेल्या हाफ-मॅरेथॉन विश्वविक्रमापेक्षा काही मिनिटांनी जलद होता. 'हुवावे' पासून विभक्त झालेल्या ऑनर कंपनीच्या संघांनी पहिल्या तीन क्रमांकांवर बाजी मारली. या सर्व रोबोटनी स्वतः मार्गक्रमण करत विश्वविक्रमापेक्षा चांगली वेळ नोंदवली. विजेत्या संघातील अभियंता डू शियाओदी यांनी सांगितले की, हा रोबोट एका वर्षाच्या कालावधीत विकसित करण्यात आला. त्याला ९० ते ९५ सेमी लांबीचे पाय देण्यात आले आहेत, जे उत्कृष्ट मानवी धावपटूंप्रमाणे बनवले आहेत. तसेच त्यात स्मार्टफोनमध्ये वापरल्या जाणाऱ्या लिक्विड कूलिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

## जनगणनेच्या संकेतस्थळावर अरुणाचलातील शहराला चिनी नाव

■ नवी दिल्ली

**निवृत्त** भारतीय वायुदल अधिकाऱ्याने जनगणना २०२७ साठीच्या सरकारच्या स्व-नोंदणी पोर्टलवर झालेली मॅपिंगची चूक निदर्शनास आणून दिली. या पोर्टलवर अरुणाचल प्रदेशातील 'पासीघाट' शहराला चुकीने 'मेडोग' असे दाखवले होते. जे प्रत्यक्षात नियंत्रण रेषेच्या पलीकडे असलेले चीनमधील एक शहर आहे. सरकारने सांगितले की ही तांत्रिक मॅपिंग त्रुटी होती आणि ती त्वरित दुरुस्त करण्यात आली. माजी भारतीय वायुदल फायटर पायलट आणि लेखक मोहोंटो पांगिंग पाओ यांनी ही चूक स्पष्ट करताच एक्सवर त्यांची पोस्ट मोठ्या प्रमाणावर शेअर झाली आणि तत्काळ कारवाईची मागणी करण्यात आली.

## मोदींकडून आचारसंहितेचा भंग सीपीआय नेत्याचे आयोगाला पत्र

■ नवी दिल्ली

**महिला** आरक्षण विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर देशाला उद्देशून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणावर भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे (सीपीआय) नेते, राज्यसभेतील

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

खासदार संतोष कुमार यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू असताना मोदींनी भाषण करून आचारसंहितेचा भंग केला आहे, असा मुद्दा संतोष कुमार यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी तत्काळ दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

हे राजकीय हेतूने प्रेरित होते. समाजामध्ये फूट पाडून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा उद्देश या भाषणातून स्पष्ट दिसतो. हे आचारसंहितेचे उल्लंघन आहे. त्याचबरोबर मोदींचे या भाषणाचे दूरदर्शन आणि संसद टीव्ही यांसारख्या सरकारी वाहिन्यांवर प्रसारण करणे हा जनतेच्या पैशांचा दुरुपयोग आहे, असा आक्षेप संतोष कुमार यांनी घेतला आहे.

## नवनीत राणा जातीय विष पेरणारी विषवल्ली! विजय वडेट्टीवारांची टीका

■ मुंबई



**काँग्रेस** नेते विजय वडेट्टीवार यांनी माजी खासदार व भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्यावर जोरदार टीका केली आहे. राणा या जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करतात. त्यामुळे दोन समाजांत द्वेष पसरवण्याच्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच डॉ. अनिल बोंडे यांच्यावरही कारवाई व्हावी, असे त्यांनी म्हटले.

वडेट्टीवार यांनी नवनीत राणा यांच्यावर एकेरी उल्लेख करत जोरदार टीका केली. ते म्हणाले की, नवनीत राणा ही जातीय विष पेरण्यासाठी पोसलेली एक विषवल्ली आहे, असे मी मानतो. जात आणि धर्मामध्ये भांडण लावून सत्तेची पोळी कशी शेकता येईल, अशा प्रकारे पाणी घालून पोसलेली ही विषवल्ली आहे. महिलांवर अत्याचार झाला असेल तर तिथे जात-धर्म-पंथ येतो कुठे? असे कृत्य करणारा नालायकच असतो. त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. अमरावती प्रकरणी कोणी बुरख्यावाल्या नव्हत्या, असे त्या म्हणतात. ते त्यांना कसे माहिती? कशाच्या आधारावर हे बोलल्या? या बाईची सवय आहे. ही अतिशय जातीयवादी आणि धर्मांदली आहे.